कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

गुरूवार, ०६ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २१७ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thursday, 06 August 2026 | Year : 6 | Issue : 217 | Daily | Rate: Rs. 5/-

दि. ०६ ऑगस्ट २०२६



१९२०- पंढरपूरात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची बहिष्कृत वर्गाची जाहीर सभा.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

## महत्वाच्या बातम्या

### सरकारकडून मराठा समाजाचा छळ' : मनोज जरांगे

**वडीगोद्री (जि. जालना):** राज्यभरात रद्द करण्यात आलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून मराठा आरक्षण आंदोलनाचे मुख्य नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारच्या राजकीय हेवेदाव्यांमुळे आणि द्वेषापोटी शासकीय अधिकाऱ्यांवर थेट दबाव आणून कुणबी जात प्रमाणपत्रे रद्द केली जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप त्यांनी जालन्यातील वडीगोद्री येथे माध्यमांशी बोलताना केला.




प्रसारमाध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, प्रमाणपत्रे सरकारच देते आणि पुन्हा सरकारच ती रद्द करते, हा संपूर्ण प्रकार निव्वळ राजकीय हेतूने प्रेरित होऊन केला जात आहे. या निर्णयातून मराठा समाजाचा जाणूनबुजून छळ केला जात असल्याचे आणि समाजालाच टार्गेट (लक्ष्य) केले जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

ते पुढे म्हणाले की, सरकारच्या या राजकीय भूमिकेमुळे कोट्यवधी मराठा समाजाचे अतोनात नुकसान होत आहे. ज्यांची अधिकृत कुणबी नोंद सापडलेली आहे, त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याचा कायदेशीर अधिकार सरकारला किंवा प्रशासनाला नाही. जर मराठा समाजाच्या दाखल्यांवर अशी कारवाई होत असेल, तर मग इतर समाजांच्या ओबीसी प्रमाणपत्रांची तपासणी करून त्यांच्यावर अशी कारवाई का केली जात नाही? असा रोकडा सवालही जरांगे यांनी उपस्थित केला. राज्य सरकारने मराठा समाजावर सातत्याने अन्याय चालवला असल्याचा आरोप करत, या निर्णयामुळे राज्यभरात सरकारविरोधात मोठी संतापाची लाट उसळणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. नेमक्या कोणत्या तांत्रिक किंवा राजकीय कारणामुळे ही प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत, याची सविस्तर माहिती उद्या सकाळी घेऊन पुढील संघर्षाची भूमिका अधिकृतपणे मांडणार असल्याचे जरांगे पाटील यांनी शेवटी स्पष्ट केले.

### राज्यातील आरोग्यसेवा ठप्प होण्याच्या उंबरठ्यावर

**नागपूर :** महाराष्ट्रातील डॉक्टरांच्या आंदोलनाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. नियोजित शस्त्रक्रिया आणि इतर गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद केल्यानंतरही सरकारने समाधानकारक निर्णय घेतला नाही, तर गुरुवार, ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून आकस्मिक वैद्यकीय सेवाही अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा इशारा खासगी आणि सरकारी डॉक्टरांच्या संघटनांनी दिला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्यसेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना यांनी संयुक्तपणे आंदोलनात सहभागी होण्याची घोषणा केली आहे. ५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ६ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत नियोजित आणि गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. याबाबत मुंबईत सरकारसोबत चर्चा सुरू असून त्यात अद्याप काही तोडगा निघाला नाही.

संघटनांचे म्हणणे आहे की, सरकारकडून ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ठोस आणि समाधानकारक निर्णय झाला नाही, तर त्यानंतर आकस्मिक (इमर्जन्सी) वैद्यकीय सेवांसह सर्व सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात येतील. हा निर्णय रुग्णांच्या हिताविरोधात नसून सरकारच्या निष्क्रिय भूमिकेमुळे घ्यावा लागत असल्याचा दावा डॉक्टरांनी केला आहे.

बीएचएमएस–सीसीएमपी नोंदणी प्रक्रियेबाबत स्पष्ट कायदेशीर आणि नियामक चौकट तयार करावी, ती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी तसेच निवासी डॉक्टरांच्या प्रलंबित सेवा, प्रशिक्षण आणि कल्याणाशी संबंधित मागण्यांवर त्वरित निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

संघटनांच्या मते, अनेकदा सकारात्मक संवाद साधूनही सरकारने कोणतीही ठोस हमी दिलेली नाही. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, रुग्णांची सुरक्षितता आणि राज्यातील आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास धोक्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या आंदोलनात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना सहभागी असून सर्व संघटनांनी एकत्रित भूमिका घेतली आहे.

# कॉक्रोच जनता पार्टी एक दबाव गट म्हणून काम करणार : अभिजीत दिपके



**छत्रपती संभाजीनगर :** झारखंड येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी आम्ही जाणार असल्याची माहिती कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीनं पत्रकार परिषदेत देण्यात आली. देशातील जनतेचा राजकीय पक्ष, संघटना, न्याय व्यवस्था, पत्रकार यांच्यावरील विश्वास उडाला आहे, तो परत आणण्याची गरज निर्माण झाली आहे. आम्ही राजकीय पक्ष म्हणून पुढे येण्यापेक्षा जनतेच्या समस्यांवर आवाज उठवणारा दबाव गट म्हणून पुढे यायचा प्रयत्न करणार असल्याचं अभिजीत दिपके यांनी सांगितलं. दोन दिवसात होणाऱ्या बैठकीत बेरोजगारी, देशाची अर्थव्यवस्था, इथेनॉल मिश्रित पेट्रोल अशा मुद्द्यांवर पुढील रूपरेषा ठरवण्याचा प्रयत्न करणार असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. संघटनेच्या बैठकीत देशभरातून जवळपास दहा ते अकरा सदस्य उपस्थित आहेत.

अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितलं की, दोन दिवसीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं असून त्यामध्ये संघटनेची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. जंतर मंतरवर झालेलं आंदोलन यशस्वी ठरलं, आम्हाला देशभरातून समर्थन मिळालंय. त्यामुळे आता इतर राज्यांमध्ये कशा पद्धतीनं संघटनेचा विस्तार करायचा याबाबत आम्ही चर्चा करणार आहोत. दिल्लीच्या आंदोलनानंतर आमची जबाबदारी वाढली आहे. सर्वत्र संघटन कसं वाढलं पाहिजे, यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. बैठकीबाबत उद्या पत्रकारांशी संवाद साधून माहिती देण्यात येणार असल्याचंही अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केलं.

लोकांचा राजकीय पक्ष, संघटना, न्यायालय आणि पत्रकार या सर्वांवरचा विश्वास उडाला असं दिसून येत आहे. आमच्या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात समर्थन मिळालं. नुसतं शिक्षणापुरतं नाही, तर इतर विषयांवर देखील असलेला रोष दिसून आला. हा विश्वास पुन्हा निर्माण करावा लागणार आहे आणि त्यासाठी एक दबाव गट निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. आजचे राजकीय पक्ष पाहिले, तर निवडून एकासोबत येतात रात्री दुसऱ्या सोबत दिसून येतात. एखादी व्यक्ती आमदार - खासदार म्हणून निवडणून येते एका पक्षातून, तर लगेच दुसऱ्या सोबत पाहायल मिळते. नाहीतर मतदार डिलीट होतात. तसं नाही झालं तर ईडी, सीबीआय पाठवून पक्ष फोडले जात आहेत. या सर्व गोष्टींमुळे जनता त्रस्त झाली आहे. म्हणूनच एक वेगळी सामाजिक चळवळ म्हणून आम्हाला जनतेनं पाठिंबा दिला असल्याचं अभिजीत दिपके यांनी सांगितलं.

आमच्या पार्टीचे प्रेरणास्थान सोनम सर असणार आहेत, ते सध्या आजारी असल्यानं त्यांना बोलावण्यात आलं नाही. कॉक्रोच जनता पार्टी ही दबाव गटाचा एक भाग म्हणून काम करणार आहे, असं अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केलं. दोन दिवस होणाऱ्या बैठकीमध्ये लोकांचा जो विश्वास इतर गोष्टींमुळे गमावला आहे तो कसा परत आणता येईल, त्याचबरोबर ई-20 पेट्रोल बाबत आज लोक त्रस्त आहेत, त्या संदर्भात कशा पद्धतीनं आंदोलन किंवा त्याविषयी कशा पद्धतीनं व्यक्त व्हायचं, देशातील बेरोजगारी आणि सध्या देश आर्थिक संकटात सापडला आहे, या विषयांवर आम्ही चर्चा करणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. झारखंडमध्ये होत असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आम्ही पूर्ण पाठिंबा दिला आहे, इतकंच नाही तर आमचे तिथले स्थानिक पदाधिकारी आणि सहकारी त्यांना आवश्यक ती मदत करत आहेत. आम्ही देखील त्या ठिकाणी निश्चित जाणार असल्याचं अभिजीत दिपके यांनी सांगितलं.

## अनुसूचित जाती कल्याणासाठीचे ३२,३२५ कोटी २५ वर्षे खर्चाविना शिल्लक?

### आरटीआयमधून धक्कादायक दावा खुलासा

**नागपूर :** माहितीचा अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत प्राप्त अधिकृत कागदपत्रांच्या विश्लेषणातून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे अनुसूचित जातींसाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी गेल्या २५ वर्षांत तब्बल ३२,३२५ कोटींचा निधी खर्चाविना शिल्लक राहिल्याचा दावा आरटीआय कार्यकर्ते राजीव खोब्रागडे आणि आशीष फुलझेले यांनी केला आहे. या दाव्यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती, शुल्क परतावा आणि इतर शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

आरटीआयद्वारे प्राप्त झालेल्या अर्थसंकल्पीय तरतूद आणि प्रत्यक्ष खर्चाच्या वर्षनिहाय नोंदींच्या अभ्यासानुसार, २००० ते २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर होऊनही तो पूर्णपणे खर्च झाला नसल्याचे समोर आले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार २०१७-१८ मध्ये १,७४५.३० कोटी, २०१८-१९ मध्ये ३,०२३.९० कोटी, २०१९-२० मध्ये ३,७५२.४८ कोटी आणि २०२४-२५ मध्ये ३,६४६.६९ कोटी इतका निधी खर्च न झाल्याची नोंद आहे.

या निधीतून पदव्युत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परतावा, निर्वाह भत्ता, वसतिगृह सुविधा, परदेशी शिक्षण सहाय्य आणि इतर शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी अपेक्षित होती. मात्र, शिष्यवृत्ती वितरणातील विलंब, शुल्क परताव्यातील अडथळे आणि संशोधकांच्या फेलोशिपच्या प्रलंबित प्रकरणांबाबत सातत्याने तक्रारी होत असल्याचेही या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

राजीव खोब्रागडे यांनी सांगितले की, हा अभ्यास केवळ अर्थसंकल्पीय आकडेवारीपुरता मर्यादित नसून निधी खर्च न होण्यामागील प्रशासकीय कारणांचाही शोध घेतला जात आहे. विभागीय खर्चाची पद्धत, उपयोगिता प्रमाणपत्रे आणि अंमलबजावणीतील अडथळ्यांचे विश्लेषण करून सविस्तर अहवाल संबंधित घटनात्मक व वैधानिक प्राधिकरणांकडे सादर करण्यात येणार आहे. त्यांनी शासनाकडे शिष्यवृत्ती योजनांचे स्वतंत्र लेखापरीक्षण, निधीच्या वापराचे परीक्षण आणि खर्च व वितरणाची माहिती नियमितपणे सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

राजीव खोब्रागडे म्हणाले, एकीकडे शासन निधीअभावी शिष्यवृत्ती वितरणाला विलंब होत असल्याचे सांगते, तर दुसरीकडे हजारो कोटी रुपये खर्चाविना राहिल्याचे अधिकृत नोंदी सूचित करतात. विद्यार्थी, संशोधक आणि महाविद्यालये आर्थिक अडचणीत असताना ही परिस्थिती चिंताजनक असून शासनाने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी.

## परिसीमन विधेयकासाठी सरकारनं मागितलं समर्थन

**नवी दिल्ली :** संसदेत सुरू असलेली कोंडी फोडण्यासाठी आणि कामकाजातील अडथळे दूर करण्यासाठी केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी आज विरोधी पक्षनेते राहुल गांधी तथा काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वाड्रा यांची भेट घेतली. दरम्यान, संसद भवनात सुमारे ५० मिनिटे झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत परिसीमन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयक आणि FCRA दुरुस्ती विधेयकावरही सविस्तर चर्चा झाली. यावेळी, राहुल गांधी यांनी स्पष्ट केले आहे की, दिल्ली पोलिसांकडून आंदोलकांवर झालेल्या कथित लाठीचार्ज मुद्द्यावर सर्वप्रथम संसदेत चर्चा व्हावी आणि स्वतः केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात येऊन यासंदर्भात स्पष्टीकरण द्यावे. सरकारने या मुद्द्यावर संसदेत उत्तर द्यायला हवे, असे विरोधकांचे म्हणने आहे.

वृत्तानुसार, या बैठकीत सरकारकडून परिसीमन अर्थात मतदारसंघ पुनर्रचना आणि एफसीआरए या विधेयकांवरही चर्चा करण्यात आली.

## पक्षचिन्ह राजकीय पक्षाचं की विधिमंडळ पक्षाचं हाच खरा प्रश्न' : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह कुणाचं या मुद्द्यावरून सध्या सर्वोच्च न्यायालयामध्ये महत्त्वपूर्ण सुनावणी सुरू आहे. या सुनावणीदरम्यान, उद्धवसेनेच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल हे युक्तिवाद करत असून, शिवसेनेत पडलेली फूट आणि पुढील घटनाक्रम यामधील महत्त्वाचे मुद्दे न्यायालयासमोर मांडत आहेत. यादरम्यान, पक्षचिन्ह राजकीय पक्षाचं की विधिमंडळ पक्षाचं हाच खरा प्रश्न आहे, असं विधान सर्वोच्च न्यायालयाने केल्याने या सुनावणीमधून ठाकरेंना आशेचा किरण दिसू लागला आहे.



आजच्या सुनावणीवेळी कपिल सिब्बल यांनी या प्रकरणातील काही महत्त्वाच्या बाबी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. यामध्ये निवडणूक आयोगाकडून शिवसेनेला मान्यता देण्यात आली होती. बाळासाहेब ठाकरे हे शिवसेनेचे प्रमुख होते. पुढे उद्धव ठाकरे हे पक्षप्रमुख बनले. २०१८ साली त्यांची पुन्हा पक्षप्रमुख पदी निवड झाली. त्यांनीच एकनाथ शिंदे यांना नेते म्हणून नियुक्त केले होते. दरम्यान, शिवसेनेत फूट पडल्यानंतर काही आमदार हे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना गटनेतेपदावरून हटवून अजय चौधरी यांची गटनेतेपदी नियुक्ती केली. तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे वेगवेगळे आहेत. तसेच राजकीय पक्षाचा प्रमुख हाच गटनेत्याला हटवू शकतो, असा युक्तीवादही सिब्बल यांनी केला. सिब्बल यांनी पुढे सांगितले की, सुरुवातीला या फुटीर आमदारांची संख्या १६ होती.पुढे ती संख्या वाढून २२ एवढी झाली.त्यावेळी अधिवेशन बोलावणे आणि आणि बहुमत सिद्ध करायला लावण्याचे निर्णय न्यायालयाने रद्दबातल ठरवले होते. मात्र उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांना दिलासा मिळू शकला नाही. या संपूर्ण प्रकरणात अध्यक्षांची निवड ही एक अत्यंत महत्त्वाची घटना होती, कारण अपत्रतेबाबतचा निर्णय हा अध्यक्षांनाच घ्यायचा होता, असेही कपिल सिब्बल यांनी यावेळी म्हटले.




## रामगढच्या ब्रह्मानंद कुमारचे उपोषण सुरूच

**रांची :** जेपीएससी-जेएसएससी परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांची सीबीआय (CBI) चौकशी आणि दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी झारखंडमधील रांची येथील जयपाल सिंग मुंडा स्टेडियमवर विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू आहे. या विद्यार्थी आंदोलनातील उपोषणकर्त्यांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत आहे. अशात या आंदोलनादरम्यान अन्नपाण्याचा त्याग करून उपोषण करणारा रामगढचा विद्यार्थी ब्रह्मानंद कुमार सध्या चर्चेत आहे.



ब्रह्मानंद कुमार आपल्या मागण्यांसाठी एकाच जागी बसून उपोषण करत आहे. पाऊस आणि खराब हवामान असूनही, त्यानं आपली जागा सोडलेली नाही. मुसळधार पावसामुळं त्यांचे कपडे भिजले आहेत. तरीही त्याचा उपोषणाचा निर्धार कायम आहे. त्यानं आता मौनव्रत धारण केलं असून तो बोलण्याऐवजी हावभावांतून आपले विचार व्यक्त करत आहे.आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, ब्रह्मानंद कुमार यांचा लढा वैयक्तिक नसून झारखंडच्या तरुणांच्या भविष्यासाठी आणि परीक्षा पद्धतीतील पारदर्शकतेसाठी आहे. तो आपलं आंदोलन शांततेनं सुरू ठेवणार आहे.

दरम्यान, सदर रुग्णालयातील डॉक्टरांचे एक पथक आंदोलकांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी आंदोलनस्थळी नियमितपणे भेट देत आहे. डॉक्टर नियमित आरोग्य तपासणी करून अहवाल तयार करत आहेत.



“ आशा कधी सोडू नका, तीच मनाला आधार देते. ”



# संपादकीय

## महाराष्ट्रात खड्ड्यांचा शाप की भ्रष्टाचाराचा महोत्सव

पावसाळा आला की महाराष्ट्रातील नागरिकांना पावसापेक्षा अधिक भीती वाटते ती रस्त्यांवरील खड्ड्यांची. कारण या राज्यात पाऊस हा नैसर्गिक आपत्ती नसून, भ्रष्टाचाराचे पितळ उघडे करणारा आरसा बनला आहे. पहिल्या-दुसऱ्या पावसानंतरच मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, नवी मुंबई आणि राज्यातील असंख्य शहरांतील रस्ते उखडून पडतात. प्रश्न असा आहे की, हे रस्ते खरोखर पावसामुळे उखडतात की भ्रष्टाचारामुळे? जर काही दिवसांच्या पावसाने कोट्यवधी रुपयांचे रस्ते वाहून जात असतील, तर ती विकासाची नव्हे, तर लुटीची साक्ष आहे. दरवर्षी शासन रस्ते बांधणी आणि दुरुस्तीवर हजारो कोटी रुपये खर्च केल्याचा दावा करते. अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा होतात, निविदा काढल्या जातात, उद्घाटने होतात, फिती कापल्या जातात आणि प्रसिद्धीचे फलक झळकतात. पण जनतेला मिळते काय? काही महिन्यांत उखडणारे रस्ते, जीवघेणे खड्डे आणि अपघातांची अखंड मालिका! मग प्रश्न विचारण्याचा अधिकार जनतेला नाही का? करदात्यांचा पैसा नेमका जातो कुठे? रस्ते बांधले जातात की भ्रष्टाचाराचे महाल उभे राहतात? आज राज्यातील अनेक रस्त्यांवर वाहन चालविणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे. दुचाकीस्वार रोज घसरत आहेत, रुग्णवाहिका अडकत आहेत, शालेय बस हेलकावत आहेत, गर्भवती महिलांना आणि गंभीर रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. अनेकांचे हात-पाय तुटतात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात. नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे चार नागरिकांचा मृत्यू झाला. अशा घटना इतर शहरांतही सातत्याने घडत आहेत. या मृत्यूंना अपघात म्हणायचे की प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे झालेली मनुष्यहत्या? सरकार याचे उत्तर देणार का? सर्वात गंभीर बाब म्हणजे या संपूर्ण व्यवस्थेत दोषी कोण, हे सर्वांना माहीत असूनही कोणावर कारवाई होत नाही. निकृष्ट दर्जाचे काम करणारा ठेकेदार दुसऱ्याच दिवशी नवीन कामाचे कंत्राट मिळवतो. दर्जाहीन कामाला प्रमाणपत्र देणारा अभियंता सुरक्षित राहतो. संबंधित अधिकारी पदावर कायम राहतात. लोकप्रतिनिधी पुन्हा त्याच ठेकेदारांसोबत उद्घाटने करतात. मग जनतेने विश्वास ठेवायचा तरी कोणावर? भ्रष्टाचार करणाऱ्यांना संरक्षण देणारी व्यवस्था आणि त्याचे परिणाम भोगणारी जनता, हेच आजचे वास्तव आहे. प्रश्न फक्त खड्ड्यांचा नाही, तर शासनाच्या प्राधान्यक्रमाचा आहे. रस्ता तयार झाल्यानंतर त्याची गुणवत्ता तपासली जाते का? कामाच्या प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र तांत्रिक तपासणी केली जाते का? निकृष्ट साहित्य वापरल्याचे आढळल्यास किती अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले? किती ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले? किती लोकप्रतिनिधींना जबाबदार धरण्यात आले? सरकारने ही आकडेवारी जनतेसमोर जाहीर करण्याचे धाडस दाखवावे. दरवर्षी पावसाळ्यात एकच नाटक सुरू होते. नागरिक संतप्त झाले की खड्ड्यांत थोडे डांबर टाकले जाते. दोन दिवस फोटोसेशन होते. प्रसारमाध्यमांसमोर ‘तातडीची कारवाई’ झाल्याचा दावा केला जातो. आठ-दहा दिवसांनी तेच डांबर वाहून जाते आणि पुन्हा नवीन दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरू होते. हा विकास नाही; हा जनतेच्या पैशावर चालणारा संघटित आर्थिक गैरव्यवहार आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे की काही ठेकेदारांसाठी खड्डे हेच सर्वात फायदेशीर उद्योग तर झालेले नाहीत ना? सरकारने हेही लक्षात ठेवावे की रस्त्यावरील प्रत्येक खड्डा हा केवळ डांबरातील भगदाड नसतो; तो प्रशासनाच्या जबाबदारीतील खड्डा असतो. त्या प्रत्येक खड्ड्यात जनतेचा कर, विश्वास आणि कधी कधी एखाद्या कुटुंबाचा कर्ताही गाडला जातो. रस्त्यावर मृत्यू झाल्यावर पाच लाखांची मदत जाहीर करणे सोपे आहे; पण त्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्यांना तुरुंगात पाठविण्याचे धैर्य सरकार दाखवणार का? आता वेळ आली आहे ती कठोर निर्णयांची. ज्या ठेकेदाराचा रस्ता हमी कालावधीत उखडेल, त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहिजे. निकृष्ट कामाला मंजुरी देणाऱ्या अभियंत्यांची सेवा समाप्त झाली पाहिजे. संबंधित विभागप्रमुख आणि स्थानिक अधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. दोषींकडून संपूर्ण नुकसानभरपाई वसूल झाली पाहिजे. प्रत्येक रस्त्याची गुणवत्ता, खर्च आणि हमी कालावधी सार्वजनिक पोर्टलवर उपलब्ध करून जनतेला थेट उत्तरदायित्वाची हमी दिली पाहिजे. आता जनतेलाही शांत बसून चालणार नाही. कर भरणारा नागरिक जर सुरक्षित रस्ता मागत असेल, तर ती त्याची भीक नसून घटनात्मक हक्काची मागणी आहे. सरकारनेही लक्षात ठेवावे. जनतेच्या सहनशीलतेचा अंत झाला की प्रश्न केवळ खड्ड्यांचा राहत नाही; तो सत्तेच्या विश्वासार्हतेचाही बनतो. म्हणूनच आज महाराष्ट्र सरकारला थेट प्रश्न आहे - रस्त्यांवर पडणारे खड्डे बुजवणार आहात की भ्रष्टाचाराचे खड्डे? जनतेचे जीव वाचवणार आहात की ठेकेदारांचे हित? करदात्यांचा पैसा विकासासाठी वापरणार आहात की भ्रष्ट व्यवस्थेच्या पोषणासाठी? आता उत्तर शब्दांत नको; कृतीत हवे. कारण प्रत्येक पावसानंतर उघडणारे खड्डे हे निसर्गाचे नव्हे, तर व्यवस्थेच्या अपयशाचे आरोपपत्र आहेत आणि या आरोपपत्रावर सही कोणाची आहे, याचे उत्तर महाराष्ट्रातील जनता मागत आहे.●●

# विनाश काले - विपरीत बुद्धी

RSS चे जॉइंट सेक्रेटरी यांनी ABVP च्या कार्यक्रमात विद्यार्थ्यां समोर बोलताना, CJP च्या जंतर मंतर वरील आंदोलनाबाबत जे वक्तव्य केले. या भाषणाची मीडियामध्ये खूप चर्चा सुरू आहे. ते म्हणतात, हे आंदोलन समाज विरोधी व असंवैधानिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील दि. 25 नोव्हेंबर 1949 च्या भाषणाचा संदर्भही देतात. आंदोलनकर्त्यांना बदनाम करून युवाबाबत - Gen - Z बाबत गैरसमज निर्माण करून त्यांचे खच्चीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे,



असे माझे मत आहे. सत्तेच्या बाजूने असलेल्यांनी गव्हर्नन्सचे वास्तव व युवकांची न्याय मागणी लक्षात घ्यावी. सर्वसामान्य, शोषित-वंचित, गरीब, दुर्बल, दुर्लक्षित समाज घटकांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, वस्तीत सेवा सुविधा, अन्याय-अत्याचार प्रतिबंध, सुरक्षा, सन्मान याकडे लक्ष देऊन प्रतिष्ठापूर्वक जगण्याचे प्रश्न सोडविण्याकडे सरकारचा, प्रशासनाचा भर असावा. खरेतर या आंदोलनाचे व युवकांच्या हिंमतीचे व समजदारीचे कौतुक करायला पाहिजे. एवढ्या मोठ्या आंदोलनात काही किरकोळ प्रकार अजाणतेपणे किंवा कोणामुळे झाले असतील तर त्याकडे दुर्लक्ष करण्यातच शहाणपण आहे. युवकांच्या भावना, त्यांचे प्रश्न समजून घेत, संवाद साधला पाहिजे. उलट, त्यांना व CJP च्या युवा नेत्यांना अडचणीत आणण्याचा, दबाव टाकण्याचा प्रयोग केला जाणे हे बरोबर नाही. संविधानिक लोकशाही व्यवस्थेत मत मांडण्याचा, शांततापूर्ण आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. सरकारने संविधानाचा सन्मान करावा, vindictive होऊ नये. Gen-Z आणि आता Gen-Alpha चे म्हणणे काय आहे हे मैत्रीपूर्ण वातावरणात जाणून घ्यावे. आंदोलनाची स्थिती उद्भवू नये असे काम शासन प्रशासनाने करण्यात पुढाकार घेण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील दि. 17 डिसेंबर 1946 चे, objective resolution वरील भाषणसुद्धा लक्षात घेण्याची गरज आहे. मुस्लिम लीगला सोबत घेण्याबाबतचा विषय होता. बर्कचा संदर्भ देत डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘फक्त बळाचा वापर हा तात्कालिक उपाय होय. त्यामुळे काही काळासाठी विद्रोह शमल्यासारखा वाटतो पण पुन्हा विद्रोह शमविण्याची आवश्यकता मात्र त्यामुळे नाहीशी होत नाही.’ पुढे पुन्हा बर्कचा संदर्भ देत डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘सत्ता देणे सोपे आहे पण सुज्ञपणा-शहाणपण देणे महाकठीण कर्म आहे.’ आपण आपल्या आचरणाने हे सिद्ध करू या की, जर या संविधान सभेने स्वतःकडे सार्वभौम अधिकार घेतले असतील तर ही सभा त्या अधिकाराचा वापर शहाणपणे करू इच्छिते. या देशातील सर्व समाजघटकांना आपल्यासोबत आणण्याचा हाच एकमेव मार्ग होय. याशिवाय आपणास एकात्मतेकडे नेणारा अन्य कोणताही मार्ग नाही. या मुद्द्यांवर कोणाच्याही मनात कोणतीही शंका असू नये’. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे भाषण खूप महत्वाचे आहे, सत्ताधाऱ्यांनी जरूर वाचावे. आपल्याच देशाच्या युवकांशी जे देशाचे नागरिक आहेत, त्यांच्याशी वैरभावनेने वागणे उचित नाही.

**माझे मत**



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

CJP च्या आंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरची प्रतिमा होती, संविधान होते, महात्मा गांधी होते, शहीद भगत सिंग होते. जयभीमचा जयघोष होता. जयभीमचे नारा म्हणजे सामाजिक न्याय, समानता, स्वातंत्र्य, बंधुताचा, राष्ट्राच्या अखंडतेचा जयघोष आहे. हे पॉझिटिव्ह मुद्दे होते. हल्ली सगळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतात, सोयीने सांगतात. मात्र त्यानुसार वर्तन करीत नाही. हे आंदोलन आपल्या फायद्याचे व मनासारखे झाले नाही, म्हणून सत्ताधाऱ्यांनी इगोचा विषय करून, द्वेषपूर्ण कार्यवाही करू नये. सरकारने युवा पिढीशी संवेदनशीलतेने संवाद साधावा आणि प्रश्न सोडवावेत. हेच संविधानिक कार्य ठरेल. ●●

# साद घालतो कबीर



बरेच लोकं प्राण्यासारखेच जगतात. प्राणी भुक लागली की खातो आणि भुक नसेल तर आराम करतो किंवा झोपतो....तसे काही माणसे देखील अशा प्राण्यासारखीच वागतात. अशा आळशी, कर्तव्यहीन लोकांना तथागतांनी 'अप्पमादो' व्हा... म्हणजेच सावधान राहा, जागृत रहा, सत्कर्म करा... असा उपदेश दिला.

**अप्पमादो अमतपदं, पमादो मच्चुनो पदं**
**अपमत्ता न मीयन्ति, ये पमत्ता यथा मता**

अप्रमाद हे निर्वाण पद प्राप्त करून देतं तर प्रमाद म्हणजे बेसावधपणा ही मृत्यूची पायवाट आहे. जो सजग असतो तो खऱ्या अर्थाने जीवन जगत असतो आणि जे प्रमादी...बेसावध असतात ते दिसतात. जिवंत पण मृतासारखेच असतात... संत कबीर देखील लोकांना बजावतात...



प्रा. वसंत वावरे
मो. 9403304670

**‘रात गँवाई सोयकर**
**दिवस गँवायो खाय**
**हिरा जनम अमोल था**
**कौडी बदले जाय’**

अरे माणसा! रात्र फक्त झोपून गमावतोस आणि दिवस खाऊन खाऊन घालवतोस. फक्त खाणे आणि झोपणे एवढेच तुझे काम. अरे तुला एव्हढा हिऱ्यासारखा अनमोल जन्म मिळाला होता. मात्र तो जन्म तू आळसापायी कवडीमोल केलास....

# अन्न सुरक्षा, शुद्ध अन्न आणि मानसिक आरोग्य

## मेंदू व मनाचा अतूट संबंध

अन्न सुरक्षा, स्वच्छ व शुद्ध अन्न आणि पाणी या विषयावर जितके तुकाराम मुंढे, भा.प्र.से. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य आल्यापासून बोलले आणि लिहिले जायला लागले आहे, तितके यापूर्वी कधी झाले नव्हते. लोकांमध्ये अन्न शुद्धतेबाबत जागरूकता आल्याशिवाय अन्न पुरवठादार आणि हॉटेल व्यावसायिक सुधारणार नाहीत. मुंढे साहेबांनी कारवाया सुरू केल्यानंतर अन्न भेसळ करणारे आणि निकृष्ट अन्नपुरवठा करणाऱ्यांना चाप बसला आहे. औषध भेसळ, बोगस प्रोटीन, आश्रमशाळांमधील निकृष्ट अन्न आणि कारागृहांमधील दर्जाहीन अन्न व स्वच्छतेचा अभाव, हे विषय आता चर्चेत आहेत. यापूर्वी महेश झगडे यांनीही अन्न भेसळवाल्यांची हवा टाईट केली होती. ही चर्चा फक्त शारीरिक आरोग्यापुरती मर्यादित ठेवणे चुकीचे आहे. शुद्ध अन्न आणि स्वच्छ पाणी हे मानसिक आरोग्याचे सर्वात मूलभूत आधार आहेत. अशुद्ध, भेसळयुक्त आणि रसायने भरलेले अन्न थेट चिंता, नैराश्य, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव आणि भावनिक अस्थिरता वाढवते. याउलट, नैसर्गिक अन्न आणि योग्य जीवनशैली मन शांत, स्थिर आणि सक्षम ठेवते. या लेखात आपण अन्न व मानसिक आरोग्याचा सखोल संबंध पाहणार आहोत.

**अशुद्ध अन्न आणि मानसिक आरोग्यावरील थेट परिणाम :** मेंदू आणि मन यांना सतत योग्य पोषण लागते. सेरोटोनिन (आनंदाचे रसायन) आणि डोपामाइन (प्रेरणा व समाधान) यांसारख्या न्यूरोट्रान्समीटरच्या निर्मितीसाठी पौष्टिक अन्न आवश्यक आहे. जेव्हा अन्न भेसळयुक्त, रंग-सुगंधयुक्त किंवा रिकामे असते, तेव्हा ही रसायने बिघडतात.

**परिणाम स्पष्ट दिसतात :** सततची चिडचिड आणि राग, चिंता व बेचैनी वाढणे, नैराश्याची लक्षणे, एकाग्रता कमी होणे आणि निर्णयक्षमता बिघडणे, झोपेचा दर्जा खालावणे, ज्यामुळे पुढच्या दिवशी मूड आणखी बिघडतो. आश्रमशाळांमध्ये निकृष्ट अन्न मिळाल्यास मुलांमध्ये भावनिक अस्थिरता, शिकण्यातील अडचणी आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो. कारागृहांमध्ये दर्जाहीन अन्न आणि स्वच्छतेचा अभाव कैद्यांमध्ये नैराश्य, आक्रमकता आणि निराशेला चालना देतो. शुद्ध पाण्याचा अभावही सतत आजारपण आणि थकवा निर्माण करून मानसिक ताण वाढवतो.

**अन्नातील रसायने : मनाला हानी पोहोचवणारे घटक :** अन्नातील कृत्रिम रसायने मानसिक आरोग्यावर विशेष परिणाम करतात. कृत्रिम अन्न रंग काही व्यक्तींमध्ये (विशेषतः मुलांमध्ये) हायपरॲक्टिव्हिटी, अस्वस्थता, चिडचिड आणि मूड स्विंग वाढवतात. संरक्षक आणि ॲडिटीव्ह्ज आतड्यातील सूक्ष्मजीव बिघडवतात. आतडे आणि मेंदू यांचा थेट संबंध असल्याने गट ब्रेन ॲक्सीस आतड्यातील जळजळ मेंदूपर्यंत पोहोचते आणि चिंता व नैराश्य वाढवते. कीटकनाशके न्यूरोटॉक्सिक असतात. ती दीर्घकाळ संज्ञानात्मक क्षमता आणि भावनिक स्थैर्य कमी करतात. जड धातू (शिसे, पारा) लहान वयात मेंदूच्या विकासावर परिणाम करून नंतरच्या आयुष्यात चिंता, लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि मूड डिसऑर्डर वाढवू शकतात. ही रसायने मेंदूमधील जळजळ वाढवतात, न्यूरोट्रान्समीटर बिघडवतात आणि मानसिक ताण सहन करण्याची क्षमता कमी करतात. म्हणूनच अन्न भेसळविरोधी कारवाई ही मानसिक आरोग्याचीही लढाई आहे.

**मन:स्वास्थ्याचा प्रवास**



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त नैसर्गिक अन्न :** रसायने टाळून खालील नैसर्गिक पदार्थ नियमित आहारात आणल्यास मूड स्थिर राहतो आणि मानसिक ताण कमी होतो.

ओमेगा-३ समृद्ध **पदार्थ (मासे, अक्रोड, अलसी)** : मेंदूच्या पेशी मजबूत करतात आणि नैराश्याचा धोका कमी करतात.

**अँटिऑक्सिडंट्स समृद्ध फळे (डाळिंब, आंबा, संत्री, काळे द्राक्ष)** : मेंदूमधील जळजळ कमी करतात.

**हिरव्या भाज्या (पालक, मेथी, ब्रोकली)** : फोलेट आणि इतर पोषक तत्वे मूड सुधारण्यास मदत करतात.

**अंडी** : कोलीन स्मरणशक्ती आणि भावनिक स्थैर्यासाठी उपयुक्त.



**हळद :** करक्यूमिन जळजळ कमी करून मानसिक शांती वाढवते.

**किण्वित पदार्थ (दही) :** आतड्याचे आरोग्य सुधारून अप्रत्यक्षपणे मूड स्थिर ठेवतात.

**मानसिक आरोग्यासाठी आवश्यक जीवनशैली :** अन्न पाया आहे, पण जीवनशैलीशिवाय मन पूर्णपणे निरोगी राहत नाही.

**झोप :** ७-९ तास गुणवत्तेची झोप मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. अपुरी झोप चिंता आणि चिडचिड वाढवते.

**व्यायाम :** नियमित हालचाल सेरोटोनिन आणि एन्डॉर्फिन वाढवते. योग, प्राणायाम आणि चालणे विशेष फायदेशीर.

**ताण व्यवस्थापन :** ध्यान, श्वसन व्यायाम आणि निसर्गात वेळ घालवणे कॉर्टिसॉल कमी करते.

**सामाजिक संपर्क :** एकाकीपणा नैराश्य वाढवतो. कुटुंबीय आणि मित्रांसोबत संवाद ठेवा.

**मानसिक उत्तेजना :** वाचन, नवीन गोष्टी शिकणे आणि छंद मन सक्रिय ठेवतात.

**हानिकारक सवयी टाळा :** धूम्रपान, अति मद्यपान आणि जास्त स्क्रीन टाइम मानसिक आरोग्य बिघडवतात. अन्न सुरक्षा ही फक्त शारीरिक आरोग्याची नव्हे, तर मानसिक आरोग्याची मूलभूत गरज आहे. भेसळयुक्त आणि रसायने भरलेले अन्न चिंता, नैराश्य आणि भावनिक अस्थिरता वाढवते. याउलट, शुद्ध नैसर्गिक अन्न, स्वच्छ पाणी आणि समतोल जीवनशैली मन शांत, स्थिर आणि सक्षम ठेवते.

तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेली अन्न सुरक्षा चर्चा आता मानसिक आरोग्याच्या व्यापक संदर्भात पुढे नेणे गरजेचे आहे. प्रत्येकाने जागरूक ग्राहक व्हावे, शुद्ध अन्नाची मागणी करावी आणि स्वतःच्या जीवनशैलीत सुधारणा आणावी. कारण निरोगी मन हे निरोगी शरीराइतकेच महत्त्वाचे आहे आणि त्याचे मूळ शुद्ध अन्नात दडलेले आहे.●●

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त...

नऊ ऑगस्ट हा जागितक आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस आहे. आदिवासी अस्तित्व तथा अस्मितेचा गौरव दिवस आहे.अदिवासी संस्कृती अप्रितम आहे.. जल, जंगल, जमीन हे आदिवासीचे प्राण आहे.आदिवासीचा निसर्ग हा गुरू आहे.अतिप्राचीन काळापासून आदिवासी समाज नसर्गपूजक, प्रकृतीपूजक आहे. निसर्गावर अतूट प्रेम आहे. संस्कृतीचे वेगळेपण तथा मानवता आणि मानवावर असिम श्रद्धा, प्रामाणिकपणा, साधी राहणी हा वारसा त्यांनी आधुनिक विज्ञानयुगात जपण्याचे तथा संवर्धन करण्याचे कार्य आदिवासी समाज करतो आहे.

शहर असो की जंगल, समुद्रकिनारा असो की नदी, नाले अथवा डोंगरकपारी, रानावनात आदिवासी समाज निसर्गाचे रक्षण, जतन करून आधुनिक युगात वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील असो की भारतभर असो आदिवासी जागितक दिवस आपआपल्या परीने गौरव दिन, अस्तित्व दिवस, अस्मितेचे प्रतिक म्हणून आनंदाने साजरा करतात. अनेक ठिकाणी जनजागृती फेरी, जागितक दिनानिमित्त आदिवासीचे पारंपारिक नृत्य सादर केले जातात. अनेक ठिकाणी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात.तसेच रातभाज्यांचा, प्रदर्शन तथा विक्री करण्यात येते. रासायनिक खतांचा वापर न करता नैसगिक स्वरूपात रानभाज्या, रानमेवा, जल-जंगल, जमीन सह वर्तमानात उपलब्ध आदिवासी समाज उपलब्ध करून निसर्गाशी आपले अतुट नाते कायम ठेवले आहे. ही आदिम आदिवासी समाजाची नैसगिक नत्ते व देन आहे. निसर्ग आणि आदिवासी समाज यांचे अतुट नाते आधुनिक युगातही जपले जात आहे. परिवर्तनाच्या, आधुनिकेच्या जगात आदिवासी समाज समूहाचे हे निसर्गासवे असलेले संबंध पुन्हा विश्वाला जल, जंगल जमीनचे, त्यापासून मिळणारा रानमेवा, रानभाज्या, त्यापासून मिळणारे अन्न कधीही न संपणारा नैसर्गिक खजाना आहे. हे अप्रत्यक्ष सांगणारी आदिम, आदिवासी संस्कृती आहे. हे वास्तव आहे. सत्य आहे. भारत सरकारचा दृष्टीकोन या विषयी काय आहे? हा प्रश्न आदिम, आदिवासी समाजाला आहे. नृत्य, संस्कृती विषयी प्रदर्शने करून सरकारला काय सांगायचे आहे? ठेविले अनंते तैसेची रहावे? ही भूमिका तर नाही? दुर्गम, डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या आदिवासींसाठी रस्ते नाही, शिक्षण नाही, रूग्णाला नेण्यासाठी वाहन जात नाही.जुन्या परंपरेनुसार पालखीत मांडून पैदल जंगल रानापासून, हिंस्त्र पशुंच्या वावरातून दररोज सामना करावा लागतो, याचे काय? यासी आत्मनिर्भर भारत की विकसित भारत म्हणावे काय?



असली भारत रानावनात आहे. पूर्वी खेडेपाड्यात होता, आता खेडे शहराकडे वळले सर्व सोयी सुविधा उपलब्ध सहजपणे त्यांना होतात. या भूमिचा मूळमालक, मूळधानी, मूळ निवासी आदिवासी समाज कोसो दूर आहे. तरीपण जल, जंगल, जमीनचा सरंक्षण कर्ता आज संकटात आहे याची जाणीव भारत सरकारला असावी. एवढीच नव्हे अयोद्धा येथील श्रीराम मंदिरच्या बांधकामात आदिवासी गोंडवन, भामरागड परिसरातील लाकूड मोठ्या प्रमाणात भारत सरकारने वापरले. परंतु त्याच परिसरात राहणारे जंगलचे संरक्षण करणारा आदिम, आदिवासी समाज उपेक्षित कां? अमृतमहोत्सव वर्ष वर्षभर साजरे करणारे भारत सरकार जागितक आदिवासी निमित्त आदिवासी समाजाच्या विकासासाठी, उत्थानासाठी पाऊले उचलणार की नाही? हा सवाल आदिवासी सह भारतीय समाजाला पडला आहे. अनेक योजना आदिवासीच्या नावांखाली कागदावर येतात आणि जातात. परंतु मूळनिवासी आदिवासीच्या समस्या व प्रश्न जसेच्या तसेच असतात.आतातरी सरकारने लक्ष द्यावे करीता मूळ प्रवाह! मूळनिवासी, मूळमालक, मूळधनी आदिवासी समाज समूहाला मायबाप सरकार विस्थापित, दुर्लक्षित, मुख्य प्रवाहापासून दूर करित असले तर हा एक प्रकारचा संविधान विरोधी कृत्य आहे. वनवसी, दहशदवादी, नक्षलवादी इ. नामांनी त्यांचे अस्तित्व, अस्मिता संपविण्याचे किंवा संपुष्टात आणण्याचे कृत्य करण्याचे धाडस करीत असेल तर या देशातील मूळनिवासी, आदिवासी समाजाला, १७५० राज्य करणाऱ्या जमातीला इतिहास, संस्कृती सह स्वातंत्र्याच्या लढ्याला असंख्य अनाम आदिमवीरांनी देहाचे बलिदान केले. हा इतिहास संपविण्याचा घाट करू नये. आदिवासी मूळनिवासी अतिप्राचीन समुदाय आहे हे स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही त्यांचा ‘जीवनसंघर्ष’ वर्तमानातही सुरूच आहे. का? याचा विचार, अभ्यास, संशोधन आणि चिंतन करणे अत्यावश्यक आहे. आदिवासींचा वापर एटीम कार्ड सारखा होत असेल तर मूळनिवासी आदिवासींचा घोर अपमान आहे.आदिवासीच्या योजना कागदावर जन्म घेतात आणि कागदाच्या तुकड्यावर संपतात. यासी जबाबदार कोण?●●

**आदिवासी अस्तित्व**



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

# कंदिलापासून न्यायसनापर्यंत

मी स्वतः पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या. पळताना कंपाऊंडच्या तारांनी पाठ जखमी झाली. रक्त वाहत होते; पण मनातील ज्वाला त्याहून अधिक प्रखर होती. पंधरा दिवस भूमिगत राहावे लागले. पोलिसांच्या धाडींमुळे माझी लहान बहीण रात्री घाबरून रडत बसायची. त्या अश्रूंनी माझ्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची शपथ अधिक दृढ केली. या काळात माझ्या घरातील पुस्तकांचा खजिना माझा सर्वात मोठा मित्र होता. वडील उत्कृष्ट तबलावादक, कवी आणि आंबेडकरी विचारांचे निष्ठावान कार्यकर्ते होते. त्यांच्या संग्रहातील पुस्तके वाचताना माझ्या मनात लेखनाची बीजे रुजली. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी मी ‘राहुल’ ही कादंबरी लिहिली. नामांतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वास्तव आणि कल्पनेची सांगड घालणारी ही कादंबरी प्रकाशित करण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते. लेखन प्रसिद्ध व्हावे, हा ध्यास इतका प्रबळ होता की वडिलांची अंगठी विकून मी पुस्तक प्रकाशित केले. आज त्या घटनेची आठवण येते तेव्हा अपराधाची जाणीवही होते आणि त्या वेड्या ध्यासाचे कौतुकही वाटते. ‘राहुल’ला अनपेक्षित प्रतिसाद मिळाला. एका विद्यार्थ्याकडे लोक लेखक म्हणून पाहू लागले. सभांमध्ये वक्ता म्हणून निमंत्रणे येऊ लागली. प्रसिद्धी मिळाली; पण अभ्यास मागे पडू लागला. एटीकेटी मिळाली की वास्तवाची जाणीव व्हायची; तरीही समाजकार्याचे आकर्षण कमी झाले नाही. त्या काळात मला एक गोष्ट स्पष्ट समजली, पदवी माणसाला नोकरी देते; पण विचार माणसाला इतिहासात स्थान देतात. माझे विद्यार्थी जीवन हे केवळ शिक्षणाचे नव्हते; ते संघर्षाचे, वैचारिक घडणीचे आणि समाजाशी नाळ जोडणाऱ्या प्रवासाचे होते. पुढे वकिली, न्यायाधीशपद, लेखन आणि सामाजिक चळवळीमध्ये जे काही साध्य करता आले, त्याची पायाभरणी याच काळात झाली होती.

**नागपूर - स्वप्नांना दिशा देणारी कर्मभूमी :-** वर्ध्यातील विद्यार्थी चळवळीने माझ्या विचारांना धार दिली; परंतु त्या विचारांना व्यापक दिशा मिळाली ती नागपूरमध्ये. माझ्यासाठी नागपूर हे केवळ एक शहर नव्हते, ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीची भूमी, सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा आणि माझ्या आयुष्याला नवे वळण देणारी कर्मभूमी होती. एल.एल.बी.साठी नागपूर विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयात प्रवेश मिळाला, तो दिवस आजही माझ्या स्मरणात ताजा आहे. प्रवेशाची औपचारिकता पूर्ण होताच मी सर्वप्रथम दीक्षाभूमीवर गेलो. त्या पवित्र भूमीला नतमस्तक झालो. मनात एकच संकल्प होता, कायद्याचे शिक्षण केवळ उपजीविकेसाठी नव्हे, तर समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी घ्यायचे. नागपूर विद्यापीठाच्या वसतिगृहात राहण्यास सुरुवात झाली. वसतिगृहात अनेक प्रांत, जाती, भाषा आणि विचारांचे विद्यार्थी होते. त्यांच्याशी संवाद साधताना माझी वैचारिक व्याप्ती अधिक विस्तारत गेली. पण एक गोष्ट मनाला खटकत होती, विधी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती किंवा महापरिनिर्वाण दिन साजरा होत नव्हता. त्यांच्या प्रतिमेलाही स्थान नव्हते. ही बाब माझ्या मनाला अस्वस्थ करून गेली. मी काही सहकाऱ्यांना सोबत घेतले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन स्थापन केली. त्यानंतर प्रथमच महाविद्यालयात ६ डिसेंबरला महापरिनिर्वाण दिन आयोजित करण्यात आला. डॉ. बाबासाहेबांची प्रतिमा महाविद्यालयात लावण्यात आली. तो केवळ कार्यक्रम नव्हता; तो विचारांना संस्थात्मक मान्यता मिळवून देण्याचा एक छोटा पण महत्त्वाचा विजय होता. दरम्यान, माझी ‘राहुल’ ही कादंबरी नागपूरमध्येही पोहोचली होती. त्यामुळे अनेक साहित्यप्रेमी, विद्यार्थी आणि कार्यकर्ते मला ओळखू लागले. समता सैनिक दल, बहुजन समाज पक्ष, रिपब्लिकन चळवळ, दलित पँथर या सर्व प्रवाहांतील कार्यकर्त्यांशी सतत संवाद सुरू झाला. मतभेद असले तरी ध्येय एकच होते, समाजपरिवर्तन. त्या काळात धनवटे रंगमंदिर हे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे जणू वैचारिक कट्टे होते. सभागृहाबाहेर तासन्तास चर्चा व्हायच्या. फुले, शाहू, आंबेडकर, बुद्ध, भारतीय राज्यघटना, सामाजिक न्याय, संघटन आणि आंदोलन हेच आमच्या संवादाचे विषय असायचे.

नागपूर विद्यापीठाचे विशाल वाचनालय माझे दुसरे घर बनले. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या अभ्यासिकेत बसून कायद्याचा अभ्यास करीत असे; पण त्याचबरोबर समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यही तितक्याच तन्मयतेने वाचत होतो. मला तेव्हाच उमगले, वकील होण्यासाठी कायद्याचे ज्ञान पुरेसे असते; पण समाजाचा वकील होण्यासाठी इतिहास, समाज आणि मानवी वेदना समजणे आवश्यक असते. गावात मी ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलो होतो. नागपूरला शिक्षणासाठी राहिल्यामुळे ग्रामपंचायतीच्या अनेक बैठकींना उपस्थित राहता आले नाही. मला सदस्यत्व रद्द करण्याची नोटीस आली. मी उत्तर दिले, ‘मी शिक्षणासाठी नागपूरला आहे; पण गावाशी नाळ तुटलेली नाही.’ सुदैवाने सदस्यत्व कायम राहिले. गाव आणि शिक्षण या दोन्ही जबाबदाऱ्या मी जपण्याचा प्रयत्न केला. एल.एल.बी. पूर्ण झाले. त्याचबरोबर एम.ए.ची पदवीही संपादन केली. १९८७ मध्ये वकिलीची सनद हातात आली. आयुष्यातील तो अत्यंत अभिमानाचा क्षण होता. एका शेतकरी कुटुंबातील मुलाच्या



हातात आता न्यायव्यवस्थेचे शस्त्र आले होते. मी नागपूरमध्ये वकिली सुरू केली. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते वा. को. गाणार यांच्या घरी भाड्याने राहत होतो. मोठे कार्यालय नव्हते. जिथे राहत होतो, तेच घर माझे कार्यालय होते. पण मनात मोठी स्वप्ने होती. वकिली करत असताना माझा एक ठाम नियम होता, पक्षकाराचा न्याय प्रथम, फी नंतर. अनेक गरीब पक्षकारांकडे फी देण्याचीही क्षमता नव्हती. ‘जे शक्य असेल ते द्या,’ एवढेच मी म्हणायचो. अनेकदा बाहेरगावाहून आलेल्या पक्षकारांचे जेवण, राहण्याची आणि परतीच्या बसभाड्याची व्यवस्था देखील मी स्वतः करीत असे. त्या बदल्यात मला पैशांपेक्षा त्यांच्या डोळ्यांतील विश्वास अधिक मौल्यवान वाटत असे. सर्वसामान्य नागरिकांना कायद्याची माहिती व्हावी म्हणून मी 'कोर्टाची पायरी' आणि नंतर 'कोर्ट कचेरी' ही लोकप्रिय सदरे वृत्तपत्रांत सुरू केली. कायद्याची भाषा सर्वसामान्यांच्या भाषेत आणण्याचा हा प्रयत्न होता. पुढे हीच प्रेरणा 'कायदा' या पुस्तकाच्या निर्मितीचे बीज ठरली. नागपूर शहरातील अनेक सामाजिक चळवळींमध्ये मी सक्रिय सहभाग घेतला. आंदोलनातील कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले की, त्यांच्या जामिनासाठी न्यायालयात धाव घेणे हे माझे जणू कर्तव्यच झाले होते. कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी आंदोलन असो किंवा मनोरमा कांबळे प्रकरण अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहण्याचा प्रयत्न मी सातत्याने केला. आज मागे वळून पाहताना वाटते, नागपूरने मला केवळ वकील बनविले नाही; तर समाजाचा वकील, विचारांचा प्रवक्ता आणि न्यायासाठी झटणारा कार्यकर्ता बनविले. याच नागपूरने मला लेखणीची ताकद दिली, व्यासपीठाचे धैर्य दिले आणि पुढे न्यायाधीश म्हणून जबाबदारी स्वीकारण्याची नैतिक तयारी करून दिली. जीवनाच्या प्रवासात काही शहरे माणसाला निवारा देतात; पण काही शहरे त्याचे व्यक्तिमत्त्व घडवतात. माझ्यासाठी नागपूर हे असेच शहर आहे, ज्याने मला विचार, संघर्ष, आत्मविश्वास आणि समाजासाठी जगण्याची अखंड प्रेरणा दिली. १९९५ हे वर्ष माझ्या आयुष्यातील एक मोठे वळण ठरले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत न्यायाधीशपदी माझी निवड झाली आणि औरंगाबाद येथे प्रथम नियुक्ती मिळाली. वकिली करताना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणारा मी, आता न्यायदानाची जबाबदारी स्वीकारणार होतो. ही बातमी नागपूरमध्ये पसरली आणि अनेक पक्षकार माझ्याकडे आले. काहींनी आनंद व्यक्त केला, तर अनेकांच्या डोळ्यांत पाणी होते. वर्षानुवर्षे ज्यांच्यासाठी मी वकिली केली, त्यांना वाटत होते की त्यांचा माणूस आता न्यायालयाच्या दुसऱ्या बाजूला जाणार. त्या काळातील नागपूरमधील एक कुप्रसिद्ध व्यक्ती समशेर शेख माझ्याकडे आला. त्याने माझा हात हातात घेतला आणि भावुक होऊन म्हणाला, ‘साब, आप जज तो हो रहे हैं... लेकिन वकालत मत छोड़ो.’ त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. मी हसत म्हणालो, ‘मैं भी ऐसा ही सोच रहा हूँ.’ पण मनाला ठाऊक होते की आता माझा प्रवास वेगळ्या दिशेने सुरू होत आहे. न्यायाधीश झाल्यानंतर मी औरंगाबाद, वैजापूर, नाशिक, दिंडोरी, पुणे, मुंबई, इचलकरंजी, ठाणे आणि इतर अनेक ठिकाणी सेवा बजावली. न्यायासनावर बसताना माझ्यासमोर कोणाची जात, धर्म, पक्ष किंवा पद नव्हते; माझ्यासमोर फक्त कायदा आणि न्याय उभा असायचा. न्यायदान करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती - सामान्य माणूस न्यायालयात येतो, पण त्याला कायद्याची प्राथमिक माहितीही नसते. अनेकांचे प्रश्न केवळ अज्ञानामुळे निर्माण होत होते. तेव्हा माझ्या मनात विचार आला की न्यायालयात निर्णय देण्याइतकेच महत्त्वाचे काम म्हणजे समाजाला कायद्याचे शिक्षण देणे. याच विचारातून ‘कायदा’ हे पुस्तक जन्माला आले. उच्च न्यायालयाची परवानगी घेऊन हे पुस्तक प्रकाशित झाले. मला वाटले होते, काही हजार लोक ते वाचतील; पण समाजाने त्याला इतका प्रतिसाद दिला की एकामागून एक आवृत्त्या निघत गेल्या. आज या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून लाखो वाचकांपर्यंत ते पोहोचले आहे. एखादा शेतकरी फोन करून म्हणतो, ‘साहेब, तुमच्या पुस्तकामुळे माझ्या शेताच्या रस्त्याचा प्रश्न सुटला.’ एखादी महिला सांगते, ‘तुमच्या पुस्तकामुळे मला माझे हक्क कळले.’ अशा प्रत्येक फोननंतर मला वाटते, लेखनाचे सार्थक झाले. न्यायाधीश म्हणून काम करत असतानाही समाजातील प्रश्न माझ्या मनातून कधी गेले नाहीत. महिलांचे प्रश्न, परित्यक्तांचे दुःख, अनुसूचित जाती-जमातींचे प्रश्न, बौद्ध समाजाचे प्रश्न, आरक्षण, ॲट्रॉसिटी कायदा, धम्म, संविधान, शिक्षण, शेतकरी, कर्मचारी, जिथे समाजाला वैचारिक आधाराची गरज वाटली, तिथे माझी लेखणी पोहोचली. मी कधी साहित्यिक होण्यासाठी लिहिले नाही. मी कधी पुरस्कारासाठी लिहिले नाही. मी कधी प्रसिद्धीसाठी लिहिले नाही. मी लिहिले, कारण समाजाला त्या विषयाची गरज होती. म्हणूनच ‘भारतीय महिला व कायदा’, ‘ॲट्रॉसिटी कायदा’, ‘बहुजनांच्या आरक्षणातील अडथळे व उपाय’, ‘बौद्ध धम्माची ओळख’, ‘भगवान बुद्धांचे जीवन व उपदेश’, ‘धर्मांतरित बौद्धांच्या सवलतीचा प्रश्न’, ‘धर्मांतरित बौद्ध व न्यायालयाचे निर्णय’, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विद्यार्थी जीवन’, ‘पती-पत्नीसाठी रमाईचा आदर्श’ आणि इतर अनेक पुस्तके लिहिली. प्रत्येक पुस्तकामागे एक वेदना होती. प्रत्येक पुस्तकामागे समाजातील एखादी जळजळीत समस्या होती. प्रत्येक पुस्तकामागे डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची निष्ठा होती. माझ्यासाठी लेखणी ही केवळ शाईने लिहिणारे साधन नव्हते; ती सामाजिक न्यायाची मशाल होती. निवृत्तीनंतरही माझा दिवस समाजासाठीच सुरू होतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक फोन करतात. कोणी शेतकरी असतो, कोणी कर्मचारी, कोणी विद्यार्थी, कोणी महिला, कोणी सामाजिक कार्यकर्ता. त्यांना वेळ देणे, त्यांचे प्रश्न ऐकणे, कायदेशीर मार्गदर्शन करणे, हे माझे आजही अखंड सुरू असलेले ‘मोबाईल विधी सहाय्य केंद्र’ आहे. या कार्यासाठी मला अनेक पुरस्कार मिळाले. समाजभूषण, समाजरत्न, धम्मरत्न, नागवंशी आणि इतर अनेक सन्मान. पण मला जर कोणी विचारले की सर्वात मोठा पुरस्कार कोणता? तर माझे उत्तर एकच असेल - ‘एखादा अनोळखी माणूस फोन करून म्हणतो, 'साहेब, तुमच्यामुळे मला न्याय मिळाला.' यापेक्षा मोठा पुरस्कार या आयुष्यात नाही.’ आज माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून पाहताना मला कोणताही पश्चात्ताप वाटत नाही. मी परिपूर्ण नाही; चुका झाल्या असतील. पण एक गोष्ट नक्की आहे, मी माझी लेखणी, माझे ज्ञान आणि माझे आयुष्य समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी अर्पण केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला संविधान दिले, स्वाभिमान दिला आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले. त्यांच्या त्या ऋणाची परतफेड पूर्ण आयुष्य देऊनही होणार नाही. मी जे काही केले, ते त्या महासागरात टाकलेल्या एका थेंबाइतकेच आहे. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत माझी लेखणी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायासाठी चालत राहील, हीच तथागत बुद्धांच्या चरणी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माझी खरी अभिवादनांजली आहे. सर्वांना मंगल मैत्री!●●



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

06 August 2026 page 03_Layout 1 05-08-2026 04:58 PM Page 1



# विश्व शांतीदूत फुजीई गुरुजी

**जागतिक युद्धाच्या विरोधाचे अग्रणी सेनानी आणि विश्वशांती स्तूपाची उभारणी करणारे जपानचे बौद्ध धम्मगुरू फुजीई गुरुजी यांची आज ६ ऑगस्ट रोजी १४१वी जयंती त्यानिमित्ताने...**



जपान देशात बुद्धधम्म केव्हा आणि कसा रुजला हे निश्चितपणे सांगता येणे कठीण असले तरी देखील सहाव्या शतकाच्या आसपास जपानला बौद्ध धम्माची ओळख झाली. त्याच काळात सम्राट शोतोकु (इ.स. ५३९ ते ५७२) यांनी बौद्ध धम्मावर अनेक रसाळ धम्मप्रवचने दिली आणि 'होक्केगिशो' नावाचा ग्रंथ उदयास आला. किमान दोनशे वर्षांनी (इ.स. ७९४ ते ११८५) साईको यांनी हायेई पर्वतावर एक बौद्ध केंद्र स्थापन करून सद्धम्मपुंडरिकचा संकल्पित प्रचार संपूर्ण देशात सुरू केला. आयेसाई, होनन आणि शिनरान याच परंपरेतून ७०० वर्षापूर्वी महाबोधिसत्त्वचरित निचिरेन यांनी आपल्या धम्माची मुहूर्तमेढ रोवली. तोच धागा पकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक पावलेल्या 'निप्पोनझान म्योहोजी' या जागतिक भिक्खू-भिक्खुणी संघाची स्थापना निचिदाच्छु फुजीई गुरुजींनी १९१३ मध्ये अर्थात ११३ वर्षापूर्वी केली.

पूज्य भदन्त ग्यांशोईन निचिदाच्छु फुजीई गुरुजी यांचा जन्म ६ ऑगस्ट १८८५ रोजी जपानमध्ये झाला. १९०४ मध्ये तरुण वयातच ते बुद्धधम्माच्या विचारांनी प्रेरित झाले. पूज्य भदन्त निचिरेन यांच्या हस्ते त्यांनी भिक्खूची दीक्षा घेऊन शिष्यत्व स्वीकारले. कृषी विषयातील एम.एस्सी. परीक्षेत प्रथम येण्याचा मान मिळविल्यानंतरही त्यांनी सांसारिक यशापेक्षा मानवकल्याणाचा मार्ग निवडला. 'ना-मु-म्यो-हो-रें-गे-क्यो' या तत्त्वज्ञानातून दुःखी व कष्टी मानवतेच्या हितासाठी कार्य करण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले. निचिरेन यांच्या तत्त्वज्ञानात भगवान बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा आणि मानवमुक्तीचा संदेश दडलेला आहे, असा त्यांचा दृढ विश्वास होता. हा संदेश संपूर्ण मानवजातीपर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी संकल्प केला. १६ जानेवारी १९३१ रोजी ते भारतात आले. राजगीर, बुद्धगया आणि कुशीनगर या पवित्र बौद्ध स्थळांना भेट देऊन त्यांनी भारताला कर्मभूमी मानले. या काळात महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. मुंबईच्या वरळी येथे त्यांनी 'निप्पोनझान म्योहोजी' परंपरेचा जपानी शैलीतील सुंदर बुद्धविहार उभारला. ४ ऑक्टोबर १९३३ रोजी वर्धा येथे त्यांनी महात्मा गांधी आणि जमनालाल बजाज यांची भेट घेतली. आचार्य विनोबा भावे यांच्या कार्याबद्दल त्यांना विशेष आदर होता. जपानमध्ये त्यांनी 'सर्वोदय' हे मासिक सुरू केले आणि 'जपान-भारत सर्वोदय मैत्री संघ' स्थापन करून दोन्ही देशांतील मैत्री व शांततेचे संबंध अधिक दृढ केले.१९५० मध्ये वरळी येथे कर्मवीर तात्यासाहेब (मास्तर आर. एन. चव्हाण) यांच्या सहकार्याने बुद्धविहार उभारण्यात आला. याच विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम बोधिवृक्षाचे रोप लावून बुद्धवंदना केली. त्याच ठिकाणी फुजीई गुरुजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ऐतिहासिक भेट घडवून त्यांचा सत्कारही करण्यात आला. भारतातील बुद्धधम्माच्या प्रचार-प्रसारासाठी केलेल्या मोलाच्या कार्याची दखल घेऊन नवनालंदा महाविहाराने २२ फेब्रुवारी १९७४ रोजी त्यांना विद्यावारिधी (डी.लिट्.) ही सर्वोच्च मानद उपाधी प्रदान केली. तसेच भारत सरकारने त्यांना आंतरराष्ट्रीय जवाहरलाल नेहरू शांती पुरस्काराने सन्मानित केले. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबाँब हल्ल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन अण्वस्त्रविरोध, निःशस्त्रीकरण आणि जागतिक शांततेसाठी समर्पित केले. त्यांच्या प्रयत्नांतून भारतासह विविध देशांत ८० हून अधिक विश्वशांती स्तूप उभारले गेले. भारतातील पहिला विश्वशांती स्तूप १९६५ मध्ये राजगीर येथे उभारण्यात आला. त्यानंतर वैशाली, लुंबिनी, कोलकाता, भुवनेश्वर, दार्जिलिंग, लद्दाख आणि वर्धा येथेही विश्वशांती स्तूपांची उभारणी झाली. हे स्तूप सर्व धर्मीयांसाठी शांतता, प्रेम आणि बंधुभावाचे प्रतीक मानले जातात.१९८१ मध्ये त्यांनी जपानमध्ये 'जागतिक शांती मार्च' आयोजित केला तसेच टोकियो येथे परमाणू निःशस्त्रीकरणावर आंतरराष्ट्रीय संमेलन भरविले. त्यांच्या कार्यामुळे ते आधुनिक युगातील बुद्धांचे श्रेष्ठ शिष्य आणि 'जपानचे गांधीजी' म्हणून ओळखले जाऊ लागले. युद्धग्रस्त जगाला शांतता, करुणा आणि मानवतेचा संदेश देणारे त्यांचे विचार आज अधिकच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरतात. जगात बौद्ध धम्म हा एकमेव असा धर्म आहे जो माणसाला खऱ्या अर्थाने स्वतंत्र करतो. खरी शांतता ही शस्त्रांनी नाही, तर बुद्ध विचारांमधील प्रेम, दया आणि करुणेने प्रस्थापित होऊ शकते. बुद्धांचा धम्म हा ज्ञानाचा मार्ग दाखवतो आणि मानवी जीवनातील अंधार दूर करतो. बुद्धांच्या शिकवणीचे सार मानसिक गुलामगिरी नष्ट करणे हे आहे असे गुरुजींचे ठाम मत होते. त्यांचे विचार आचरणात आणणे हीच त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरेल. सुमारे शंभर वर्षाचे आयुष्य सुखासमाधानाने जगून श्रद्धेय फुजीई गुरुजी यांचे ९ जानेवारी १९८५ रोजी जपानमध्ये परिनिर्वाण झाले. आज ४ ऑगस्ट २०२६ रोजी फुजीई गुरुजींची १४१ वी जयंती जगभर साजरी होत आहे. उत्तुंग पावन स्मृतीला त्रिवार वंदन.●●



मिलिंद मानकर
मो. 8177866397

## श्रीमती

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

पालकर बेटी को जिसने, सारा जहाँ दे दिया, कैसे पुछ लेते हैं लोग कि, तेरे बाप ने हमें क्या दिया' ! एखादी विवाहित स्त्री जेव्हा तिच्या माहेरी जाते तेव्हा ती सर्वप्रथम आपल्या आईला शोधते आणि जेव्हा ती सासरी परत येते तेव्हा आपल्या पतीला शोधते. कारण, या दोन व्यक्ती शिवाय तिच्या आयुष्याला पुर्तता मिळत नाही. तिच्या मनात आपल्या जोडीदाराबद्दल हाच भाव असतो की, 'तुम जरूरी क्या हुए, हम अधूरे हो गए'. जर अशा पत्नीला तिचा जोडीदार हे म्हणत असेल की, तुझ्या बापाने मला काय दिले? तर याला काय म्हणावे? त्या व्यक्तीला हे सांगावे वाटते की, 'मत छोड उसको उसके हाल पर, ससुराल में तुम्हारे सिवा उसका कोई नहीं.' कुणाचे कुणाशी कोणते नाते आहे यापेक्षाही त्या नात्यात आपुलकी, जिव्हाळा किती आहे हे महत्वाचे असते. कोणतेही नाते तोपर्यंत चांगले असते जोपर्यंत प्रेम, काळजी, आस्था दोन्ही बाजूंनी असते. ज्या दिवशी या गोष्टी एकतर्फी होतात तेव्हा समजून जावे की आता नात्यातील गोडी संपलेली आहे. 'रिश्ते वही अच्छे होते है, जहां समझ होती है, समझौते नहीं' आजकालच्या या धकाधकीच्या जिवनात महिलांची दोन्ही बाजूंनी कुचंबणा होते. पदवी आहे, योग्यता आहे पण कुटुंबाची गरज म्हणून घराच्या उंबरठ्याच्या आत ती केवळ चूल आणि मूल या गोष्टीत आपले आयुष्य व्यतीत करते. याऊलट दुसऱ्या बाजूचा विचार केला तर जेव्हा एखादा कमावता पुरुष घरी येतो तेव्हा त्याला आयते जेवण मिळते. पण जेव्हा एखादी कमावती महिला घरी येते तेव्हा तिला संपूर्ण घरासाठी प्रथम स्वयंपाक तयार करून मग स्वतः जेवावे लागते. समस्या ही नाही की, महिला आत्मनिर्भर झाल्या आहेत तर समस्या ही आहे की, पुरुष अजूनही आत्मनिर्भर का झाला नाही? अर्थात सर्वच घरात ही परिस्थिती आहे असे नाही. पण बऱ्याच कुटुंबाचे हेच जळजळीत वास्तव आहे. एकदा कुणीतरी महिलांना श्रीमती का म्हणतात? असे विचारल्यावर या प्रश्नाच्या उत्तरात तो म्हणाला "श्रीमती या शब्दाचा अर्थ असा होतो की, श्री म्हणजे लक्ष्मी आणि मती याचाच अर्थ बुद्धी, म्हणजेच सरस्वती. थोडक्यात काय तर, महिला कमावू शकते. म्हणजे लक्ष्मी, कमावलेल्या पैशाची आपल्या बुद्धीने बचत करते ती सरस्वती, जेथे 'श्री आणि मती' या दोहोंचा सुरेख संगम असतो तो संगम म्हणजे श्रीमती लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र वास करतात त्याला श्रीमती म्हणतात. 'पत्नी कोई वस्तु नहीं, जो मन चाहा वैसा व्यवहार किया जाए, वो जीवन की साथी है, उसे भी प्रेम और अधिकार दिया जाए, जो हर सुख, दुख में साथ खड़ी रहती है ,बनकर ढाल, उसके सम्मान का भी रखना हर पल ख़याल, वो घर संभाले, बच्चे संभाले, रिश्तों की डोर संभाले, फिर भी अक्सर अपने हिस्से के सपनों को टाले, याद रहे! उसकी खामोशी को कमज़ोरी मत समझ लेना, उसके त्याग को कभी मजबूरी मत समझ लेना, जिस घर में पत्नी का सम्मान होता है हर बार, वहीं फलता, फूलता और निखरता है परिवार.'●●

# बुद्धांच्या धम्माचा अखंड प्रकाश




भारतीय संस्कृतीत आषाढ पौर्णिमेला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. बौद्ध परंपरेत हा दिवस धम्मचक्र प्रवर्तनाचा प्रारंभदिवस म्हणून अत्यंत पवित्र मानला जातो. याच दिवशी भगवान गौतम बुद्धांनी वाराणसीजवळील सारनाथच्या ऋषिपत्तन (मृगदाव) येथे आपल्या पहिल्या पाच शिष्यांना धम्माचा प्रथम उपदेश दिला. या ऐतिहासिक घटनेतून मानवजातीला दुःखमुक्तीचा मार्ग प्राप्त झाला आणि करुणा, प्रज्ञा व समतेचा संदेश जगभर प्रसारित झाला. या पहिल्या धम्मदेशनेमुळे केवळ धम्मप्रवर्तनाची सुरुवात झाली नाही, तर भिक्खू संघाचीही स्थापना झाली. बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांपैकी तिसरे रत्न असलेल्या संघाचा जन्म आषाढ पौर्णिमेलाच झाला. जात, धर्म, वंश, लिंग किंवा सामाजिक स्तर यांचे भेद न मानता प्रत्येकाला समानतेने स्वीकारणारा हा संघ मानवी इतिहासातील समतावादी आणि विवेकनिष्ठ सामाजिक परिवर्तनाचा एक अद्वितीय आदर्श ठरला. आषाढ पौर्णिमेपासून बौद्ध परंपरेतील वर्षावासाला प्रारंभ होतो. पावसाळ्यातील तीन महिन्यांच्या या कालावधीत भिक्खू एका विहारात राहून ध्यान, धम्मचिंतन, अध्ययन आणि साधना करतात. उपासक-उपासिका अष्टशीलाचे पालन करतात, विपश्यना साधना करतात आणि भिक्खू संघाला आवश्यक वस्तूंचे दान देऊन धम्मकार्याला हातभार लावतात. वर्षावास हा केवळ धार्मिक विधी नसून आत्मपरीक्षण, आत्मशुद्धी, शिस्त, संयम आणि समाजसेवेचा प्रेरणादायी कालखंड आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त जीवनात बुद्धांचा मध्यममार्ग अधिकच उपयुक्त ठरतो. हिंसा, द्वेष, अंधश्रद्धा, जातीय विद्वेष आणि असहिष्णुता यांसारख्या सामाजिक समस्यांवर मात करण्यासाठी करुणा, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी मूल्यांची नितांत आवश्यकता आहे. बुद्धांचा धम्म हा अंधश्रद्धा किंवा आंधळ्या श्रद्धेवर आधारित नसून अनुभव, तर्क, चिंतन आणि सत्यशोधनावर आधारित आहे. त्यामुळे तो आधुनिक समाजालाही तितकाच सुसंगत, वैज्ञानिक आणि मार्गदर्शक वाटतो. आषाढ पौर्णिमा हा केवळ एका धार्मिक परंपरेचा उत्सव नाही; तो मानवतेचा, समतेचा, बंधुत्वाचा आणि प्रज्ञेचा प्रकाशोत्सव आहे. हा दिवस प्रत्येकाला स्वतःमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची प्रेरणा देतो. बुद्धांच्या करुणामय विचारांचा स्वीकार करून आपण आपल्या कुटुंबात, समाजात आणि राष्ट्रात शांतता, सौहार्द, न्याय आणि समतेची मूल्ये अधिक दृढपणे रुजवू शकतो. आजच्या काळात बुद्धांचा धम्म हा केवळ श्रद्धेचा विषय नसून मानवजातीच्या शाश्वत कल्याणाचा मार्ग आहे. आषाढ पौर्णिमेच्या निमित्ताने विवेक, करुणा आणि समतेची ज्योत आपल्या अंतःकरणात सदैव प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प केला, तर अधिक शांततामय, न्याय्य आणि प्रगत समाजाची निर्मिती निश्चितच शक्य होईल. हीच या पवित्र दिवसाची खरी शिकवण आणि मानवतेसाठीची सर्वोत्तम प्रेरणा आहे.●●



उमेश चित्ते
मो.७७५८८४७१४३

# बोधीवृक्षाखालील ज्ञानप्रकाश

## मानवतेला दिशा देणारी बुद्धांची चिरंतन शिकवण



मानवजातीच्या इतिहासात काही घटना अशा घडल्या आहेत की, ज्यांनी केवळ एका काळालाच नव्हे तर संपूर्ण मानवसभ्यतेलाच नवी दिशा दिली. भगवान गौतम बुद्धांना बोधगया येथे पवित्र बोधीवृक्षाखाली प्राप्त झालेला ज्ञानप्रकाश हा त्यापैकीच एक ऐतिहासिक आणि युगप्रवर्तक क्षण होय. या घटनेने जगाला करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसेचा मार्ग दिला. आजही बोधीवृक्ष हा केवळ एक वृक्ष नसून ज्ञान, आत्मजागृती आणि मानवकल्याणाचे जागतिक प्रतिक मानला जातो. सिद्धार्थ गौतम यांनी राजवैभव, सत्ता आणि भौतिक सुखांचा त्याग करून मानवी दुःखाचे मूळ शोधण्याचा संकल्प केला. अनेक वर्षांच्या तपश्चर्येनंतर वैशाख पौर्णिमेच्या पावन दिवशी बोधगया येथील पिंपळाच्या वृक्षाखाली त्यांना सम्यक संबोधी प्राप्त झाली आणि ते 'बुद्ध' झाले. या ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी मानवाला दुःखमुक्तीचा मार्ग दाखविला. चार आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्गाच्या माध्यमातून त्यांनी जीवनाकडे विवेकपूर्ण, वैज्ञानिक आणि मानवतावादी दृष्टीकोनातून पाहण्याची शिकवण दिली. बोधीवृक्षाखाली ध्यानस्थ असलेली बुद्धांची प्रतिमा आज जगभरातील कोट्यवधी लोकांसाठी शांतता, संयम आणि अंतर्मनातील स्थैर्याचे प्रतिक बनली आहे. वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण आधुनिक जीवनात बुद्धांचा धम्म मानवाला मानसिक संतुलन, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देतो. बुद्धांनी कोणत्याही अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा जातिभेदाला प्रोत्साहन दिले नाही. त्यांनी माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आणि सत्याची पडताळणी स्वतःच्या अनुभवातून करण्याचा संदेश दिला. आजच्या सामाजिक परिस्थितीत बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती हिंसा, असहिष्णुता, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक विषमता यांवर मात करण्यासाठी करुणा, मैत्री, समता आणि बंधुभाव ही बुद्धांची मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. बोधीवृक्ष आपल्याला निसर्गाशी सुसंवाद साधण्याची आणि पर्यावरण संवर्धनाचीही प्रेरणा देतो. त्यामुळे हा वृक्ष आध्यात्मिकतेसोबतच पर्यावरणीय जागृतीचेही प्रतीक ठरतो. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धांच्या धम्मातील समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांना आधुनिक भारताच्या लोकशाही व्यवस्थेचा पाया बनविले. म्हणूनच बुद्धांचे विचार हे केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक मर्यादेत न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरले आहेत. बोधीवृक्षाखाली ध्यानमग्न बुद्धांची प्रतिमा पाहताना मनाला शांततेचा अनुभव येतो. ती प्रतिमा आपल्याला बाह्य संघर्षापेक्षा अंतर्मनातील जागृतीचे महत्त्व समजावून सांगते. बुद्धांचा संदेश स्पष्ट आहे, "स्वतःचा दीप बना, सत्याचा शोध घ्या आणि मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करा." आजच्या अस्थिर जगात ही शिकवण अधिकच प्रासंगिक ठरते. बोधीवृक्षाचा ज्ञानप्रकाश हा केवळ एका धर्माचा किंवा समुदायाचा वारसा नसून संपूर्ण मानवजातीची अमूल्य सांस्कृतिक आणि बौद्धिक संपत्ती आहे. करुणा, प्रज्ञा आणि शांततेच्या या चिरंतन संदेशातूनच अधिक समतामूलक, न्याय्य आणि शांततापूर्ण समाजाची निर्मिती होऊ शकते.●●

प्रमोद जांभूळकर
मो. 9823969097

# डिग्री हातात, कंत्राट पाठीवर भारतीय तरुणाईचा 'बळी'?




आजची भारतीय तरुणाई आणि विद्यार्थी ज्या बिकट परिस्थितीतून जात आहेत, ते चित्र अत्यंत सोचनीय आहे. सरकारी नोकऱ्यांचे सर्रास कंत्राटीकरण, शाळांचे कंपनीकरण (दत्तक विधान) आणि सरकारी संस्थांचे खाजगीकरण वेगाने सुरू आहे. दुर्दैवाने, ज्या युवाशक्तीच्या खांद्यावर देशाचे भवितव्य आहे, ती तरुण पिढी सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत आणि राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधली जाऊन स्वतःच्या भवितव्याबाबत बेफिकीर दिसत आहे. सरकारच्या धोरणांमुळे बेरोजगारीचा आलेख आज 'एव्हरेस्ट'च्या शिखराला भिडला आहे.

स्पर्धा परीक्षा की जीवघेणा संघर्ष? स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल पाहिले तर अंगावर काटा येतो. दिवस-रात्र अभ्यास करून डोळे खोबणीत गेलेले, गाल बसलेले आणि मनात भवितव्याची चिंता असलेला निस्तेज चेहरा ही आजच्या अभ्यासू तरुणाची ओळख बनली आहे. भरतीची जाहिरात नाही, आलीच तर अत्यल्प जागा, वेळेत परीक्षा नाही, निकालाला होणारा अतोनात विलंब आणि त्यात सातत्याने होणारे पेपरफुटीचे ग्रहण; यामुळे विद्यार्थी आणि पालक आर्थिक व मानसिकदृष्ट्या कोलमडले आहेत. दुसरीकडे, वर्ग-१ च्या मोजक्या जागांवर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा संधी (lateral entry) दिली जात आहे. परिणामी, इंजिनिअर, डॉक्टर, पीएचडी, एमबीए, नेट-सेट, एम.एस्सी. झालेले लाखो तरुण तलाठी, पोलीस, लिपिक, ग्रामसेवक आणि चतुर्थ श्रेणी पदांच्या शर्यतीत रांगेत उभे आहेत. उच्च शिक्षणाचे हे भयानक अवमूल्यन धोरणकर्त्यांच्या अपयशाची साक्ष देते. कंत्राटीकरणाचा फास आणि पालकांची परवड आज वैद्यकीय विभागापासून ते बँका, महावितरण आणि शासकीय कार्यालयांपर्यंत सर्वच ठिकाणी ११ महिन्यांच्या तुटपुंज्या कंत्राटावर तरुणांना राबवून घेतले जात आहे. वास्तव इतके भयाण आहे की, रक्ताचे पाणी करून मुलाला शिकवणाऱ्या कष्टकरी बापाला वयाच्या चाळीशीतच म्हातारपण आले आहे. ज्या वयात मुलाने आई-वडिलांना सुखाचे चार घास द्यायचे, त्या वयात आजही शेतात राबून माय-बाप या पदवीधर बेरोजगार मुलांना खाऊ घालत आहेत. कंत्राटी भरतीमुळे तरुणांना कायमस्वरूपी नोकरीचे संरक्षण नाही, बँकेचे कर्ज मिळत नाही आणि भविष्याची कोणतीही हमी नाही. दुसरीकडे, महाराष्ट्रात शासकीय विभागात अडीच लाखांपेक्षा जास्त पदे रिक्त असताना, ती पदे कायमस्वरूपी भरण्याऐवजी ठेकेदारांमार्फत कंत्राटी पद्धतीने भरण्याचा घाट घातला जात आहे. हे आरक्षणाची चौकट मोडून काढण्याचे दुष्ट चक्र आहे.

शिक्षणाचे बाजारीकरण आणि 'दत्तक' शाळा : डॉ. पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वतःचे सर्वस्व पणाला लावून सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. परंतु आज शाळांच्या 'दत्तक विधाना'च्या नावाखाली सरकारी शाळांचा लिलाव मांडला जात आहे. सुविधांचा अभाव : स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही ग्रामीण भागातील शाळांच्या इमारती पडक्या आहेत, पिण्याचे शुद्ध पाणी नाही, स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे आणि शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा अतोनात ताण आहे. शिक्षणाचा व्यापार : ज्या कंपन्या CSR फंड देतील, त्यांना शाळा दत्तक देऊन भविष्यात शिक्षणाचे पूर्ण बाजारीकरण केले जाईल. दिल्ली किंवा केरळ राज्यांप्रमाणे बजेट वाढवून सरकारी शाळा हायटेक करण्याऐवजी, महाराष्ट्र सरकार शिक्षणाची जबाबदारी खाजगी भांडवलदारांच्या घशात घालत आहे. तरुणांनो, कपाळावरचा हात काढा आणि जाब विचारा! आपण मजूर, कास्तकारांची मुले ऐन उमेदीत राजकीय पक्षांचे झेंडे हातात घेऊन रस्त्यावर उतरतो, मोर्च्यात जातो, दंगलीत लाठ्या-काठ्या खातो आणि तुरुंगात सडतो. कधी कोणत्या मंत्र्याची, खासदाराची किंवा सनदी अधिकाऱ्याची मुले अशा मोर्च्यांत किंवा दंगलीत पाहिली आहेत का? मुळीच नाही! कारण त्यांची मुले ऑक्सफर्ड, केंब्रिज, कोलंबिया किंवा अमेरिकेत शिक्षण घेऊन मोठे उद्योग किंवा उच्च पदे सांभाळत असतात. मग ही दरी कधी मिटणार? तरुणांच्या हातात रोजगार देण्याऐवजी धर्म-जातीचे फासे फेकून त्यांची क्रयशक्ती नष्ट केली जात आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'स्किल इंडिया' च्या नावाखाली अब्जावधी रुपये खर्च होऊनही दरवर्षी बाहेर पडणाऱ्या लाखो टेक्निकल ग्रॅज्युएट्सना हाताला काम मिळत नाही, ही शोकांतिका आहे. वेळ अजूनही गेलेली नाहीः नवक्रांतीचा एल्गार व्हा! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, शासन ही लोककल्याणकारी संस्था असावी, व्यापार करण्याचे दुकान नव्हे! देशातील तरुणांना फुकटचा शिधा नको आहे, त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार सन्मानाचा रोजगार हवा आहे. इंजिनिअर किंवा पदव्युत्तर झालेल्या तरुणाने पकोडे तळावे किंवा चहा विकावा, हे त्याच्या कौशल्याचे आणि देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे विसर्जन आहे.

तरुणांनो! डीजेच्या तालावरील तल्लीनता आणि सोशल मीडियाचा आभासी मोह आता बाजूला ठेवा. कपाळावर हात ठेवून बसण्यापेक्षा आणि स्वतःची ऊर्जा निरर्थक वादात घालवण्यापेक्षा आपल्या हक्काच्या रोजगारासाठी, दर्जात्मक शिक्षणासाठी आणि सुरक्षित भविष्यासाठी सत्ताधाऱ्यांना थेट प्रश्न विचारा!

तरुणांचा एकच निर्धार : कंत्राटीकरण हटवा - बेरोजगार वाचवा! शाळांचे कंपनीकरण थांबवा - गुणवत्तापूर्ण शिक्षण वाचवा! सरकारी रिक्त पदे तात्काळ कायमस्वरूपी भरा! कौशल्यानुसार हक्काचा रोजगार द्या - नाहीतर खुर्चीवरून खाली उतरा!

'जीस और जवानी चलती है।
उस और जमाना चलता है।'●●



हरीश पुं. कुडे
9850301134

# नेहा बोरा भारतीय राजकारणाचा नवा उभारता चेहरा




सीजेपीचे आंदोलन हा केवळ विद्यार्थी आंदोलनाचा विषय नसून त्यामागे राजकीय हेतू होता, असा आरोप आता अधिक ठळकपणे पुढे येत आहे. आंदोलनादरम्यान देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीमार, रबर बुलेट, पॅलेट गन आणि बिहारमध्ये ए.के.-४७ सारख्या शस्त्रांचा वापर केल्याच्या घटना समोर आल्या. मात्र जंतर-मंतरवरील निर्णायक कारवाईच्या वेळी सीजेपीचे चारही प्रमुख नेते घटनास्थळी नव्हते. अभिजीत दीपके ट्रकमध्ये लपल्याचे सांगितले गेले, तर सौरव दास आणि आशुतोष रांका हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशी चर्चेत होते. विजेता दहिया आंदोलनस्थळ सोडून गेल्याचीही चर्चा झाली. त्यामुळे नेतृत्व आणि आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये मोठी दरी निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला. आंदोलनाच्या सुरुवातीला अभिजीत दीपके यांनी कोणत्याही विरोधी पक्षाला व्यासपीठावर स्थान दिले जाणार नाही, अशी भूमिका घेतली होती. मात्र नंतर सोनम वांगचुक यांनी राहुल गांधी आंदोलनात सहभागी झाले नाहीत, अशी सार्वजनिक टीका केली. त्यामुळे आंदोलनाची भूमिका बदलत असल्याचे दिसून आले. काहींच्या मते, या बदलामुळे आंदोलनाचा केंद्रबिंदू विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून राजकीय संघर्षाकडे वळला. आंदोलनाला सुरुवातीला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर सोनम वांगचुक यांच्या जीवाला धोका असल्याच्या बातम्या मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्या. त्यानंतर विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि देशभरातील विद्यार्थी आंदोलनात सहभागी होऊ लागले. वीस दिवसांच्या उपोषणानंतरही सरकारने प्रतिसाद दिला नाही. अखेरीस वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याचवेळी ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन (AISA)च्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांनीही आमरण उपोषण सुरू ठेवले. त्यांचे उपोषण २३ दिवस चालले आणि त्यांनाही नंतर रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान जंतर-मंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांचा कठोर लाठीचार्ज सुरूच होता. अनेक विद्यार्थ्यांना गंभीर दुखापती झाल्या, तर काहींना अटक करण्यात आली. या काळात सीजेपीचे प्रमुख नेते सुरक्षित राहिल्याने आंदोलनाचे खरे ओझे विद्यार्थ्यांनीच उचलल्याची भावना निर्माण झाली. नंतर सोनम वांगचुक यांनी मध्यरात्री उपोषण सोडले. विद्यार्थ्यांशी कोणतीही चर्चा न करता त्यांनी केंद्रीय नेतृत्वाच्या हस्ते उपोषण समाप्त केल्यामुळे अनेक आंदोलक नाराज झाले. उपोषण संपविताना कोणत्या अटी मान्य झाल्या, याबाबतही स्पष्ट माहिती देण्यात आली नाही. त्यानंतर आंदोलनातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी अधिक तीव्र केली. आंदोलकांच्या मते, पेपरफुटी, पोलिसांचा कथित अत्याचार आणि विद्यार्थ्यांवरील कारवाईसाठी जबाबदारी निश्चित होणे आवश्यक होते. आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थ्यांचे हात-पाय फ्रॅक्चर झाले, डोकी फुटली, काहींवर गंभीर अत्याचार झाल्याचे आरोप करण्यात आले. या घटनांमुळे देशभरात संतापाची लाट निर्माण झाली. सरकारवर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर टीका वाढल्याने अखेरीस धर्मेंद्र प्रधान यांनी पद सोडल्याचा दावा या लेखात करण्यात आला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या जागी नव्या केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची नियुक्ती झाली. मात्र आंदोलनानंतर अडीच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाल्याचा आरोप करण्यात आला. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या काही व्यक्तींवर कोणतीही कारवाई झाली नाही, तर अनेक विद्यार्थ्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले. त्यामुळे आंदोलनाचा खरा फटका विद्यार्थ्यांनाच बसल्याची टीका करण्यात आली. आंदोलन संपल्यानंतर सोनम वांगचुक आपल्या घरी परतले. त्यांच्या पत्नी गीतांजली यांनी राहुल गांधी यांच्या आंदोलनावर टीका केली. या विधानामुळे आंदोलनामागील राजकीय उद्दिष्टांबाबत आणखी प्रश्न उपस्थित झाले. अभिजीत दीपके यांच्या स्वागतासाठी मोठी व्यवस्था करण्यात आल्याची चर्चा झाली, तर दुसरीकडे अनेक विद्यार्थी अद्यापही गुन्हे आणि अटक यांचा सामना करत होते. याच पार्श्वभूमीवर AISAच्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांची भूमिका ठळकपणे समोर आली. त्यांनी २३ दिवस उपोषण करून आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आंदोलन संपल्यानंतरही त्यांनी माघार घेतली नाही. विविध राज्यांमध्ये जाऊन अटक झालेल्या विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी आणि त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्यासाठी त्यांनी संघर्ष सुरू ठेवला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पुन्हा आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला. राहुल गांधी आणि नेहा बोरा यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर समान भूमिका मांडली. शिक्षणव्यवस्थेवर विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव वाढत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली. तसेच विद्यार्थ्यांवरील लाठीमार आणि गोळीबाराचे आदेश कोणी दिले, हा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. नेहा बोरा यांनीही केंद्रीय गृहमंत्र्यांवर थेट टीका केली. दुसरीकडे गीतांजली वांगचुक यांच्या काही विधानांमुळे राजकीय व वैचारिक वाद अधिक तीव्र झाला. या सर्व घडामोडींमध्ये नेहा बोरा यांनी शांत, संयमी आणि संघर्षशील नेतृत्व दाखविल्याचा दावा या लेखात करण्यात आला आहे. माध्यमांसमोर भूमिका मांडणे, आंदोलक विद्यार्थ्यांना प्रेरित करणे आणि प्रशासनाशी ठामपणे संवाद साधणे, या सर्व बाबींमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व दाखवले. लेखकाच्या मते, भारतीय राजकारणात नेहा बोरा या नव्या उभरत्या नेतृत्वाच्या रूपाने समोर येत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेतली असून संघर्षाची परंपरा पुढे नेली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळू शकते आणि भविष्यात विद्यार्थी चळवळींमध्ये त्यांची भूमिका अधिक प्रभावी ठरू शकते. म्हणूनच या आंदोलनातून सर्वाधिक ठसा उमटविणारे व्यक्तिमत्त्व म्हणून नेहा बोरा यांच्याकडे पाहण्याची गरज असल्याचे लेखकाचे मत आहे.●●



हेमंत टाले
मो. 9975807632

बहुजन सौरभ

BAHUJAN SAURABHA



## नामांतरातील शहीदांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचे स्मरण करणे हीच खरी आदरांजली : विलास गजघाटे



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर व्हावे, यासाठी सन १९७८ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात ऐतिहासिक आंदोलन उभारण्यात आले. या आंदोलनात अनेक युवकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले व ते शहीद झाले. मात्र, अनेक वर्षे उलटूनही त्यांच्या कुटुंबीयांची अपेक्षित दखल घेणारा नेता पुढे आला नाही, ही खंत दीक्षाभूमी स्मारक समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास गजघाटे यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी नागपूर येथील १० नंबर पूल परिसरातील नामांतर शहीद स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच नामांतर आंदोलनातील शहीदांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचे स्मरण ठेवून त्यांना सन्मान व न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी शरद मेश्राम, सुनील भोसले, मिलिंद थुल, देवाजी रंगारी, अशोक शेंद्रे, विठ्ठलराव ढोगळे यांच्यासह अनेक आंबेडकरी कार्यकर्ते उपस्थित होते.

## भदन्त सदानंद महास्थवीर यांचे धम्मकार्य अविस्मरणीय : भदन्त विनयरक्खित



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीनंतर बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी भिक्खू संघाने गावागावांत केलेल्या कार्यात परिनिर्वाणस्थ पूज्य आचार्य उपाध्याय भदन्त सदानंद महास्थवीर सतधम्मादित्य यांचे योगदान मोलाचे असून ते कधीही विसरता येणार नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय विपश्यना आचार्य तथा आलोका ट्रस्टचे अध्यक्ष भदन्त विनयरंखिखत महास्थवीर यांनी केले. आलोका ट्रस्टच्या वतीने आलोका संघाराम महाविहार, कलमना रिंग रोड, नागपूर येथे ऑल इंडिया भिक्खू संघाचे माजी संघानुशासक पूज्य भदन्त सदानंद महास्थवीर सतधम्मादित्य यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन व आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ प्रदेश भिक्खू संघाचे अध्यक्ष भदन्त प्रियदर्शी महास्थवीर होते. यावेळी परित्त संज्झायन, धम्मदेसना, भिक्खू संघास भोजनदान व संघदान करण्यात आले. भदन्त नागदिपंकर महास्थवीर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, १९६२ मध्ये सारनाथ येथे प्रव्रज्जा आणि १९६३ मध्ये उपसंपदा स्वीकारल्यानंतर भदन्त सदानंद महास्थवीर यांनी १९६५ पासून महाराष्ट्रात धम्मप्रसारासाठी स्वतःला वाहून घेतले. विविध सभा, संमेलने, धम्मसंस्कार शिबिरे, देश-विदेश दौरे तसेच उपासक-उपासिका संघाची उभारणी करून त्यांनी बौद्ध धम्माचा व्यापक प्रसार केला. अखिल भारतीय भिक्खू संघाचे दोन दशके संघानुशासक म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. कार्यक्रमाला भदन्त महापंथ महास्थवीर, भदन्त संघानंद महास्थवीर, भदन्त धम्मज्योती महास्थवीर, भदन्त सिवनी बोधानंद महास्थवीर, भदन्त ज्ञानबोधी महास्थवीर, डॉ. भदन्त सिलवंस महास्थवीर, डॉ. धम्मोदय महास्थवीर, भदन्त प्रज्ञाज्योती महास्थवीर, भदन्त संघकीर्ती महास्थवीर, भिक्खू प्रशील तसेच श्रामणेर संघ, दायक-दायिका, उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पञ्ञा मेत्ता संघद्वारे भदंत सदानंद महास्थविर यांच्या स्मृतिदिनानिमित्त वृक्षारोपण





**नागपूर :** पञ्ञा मेत्ता संघद्वारे संचालित शाळेत भदंत सदानंद महास्थविर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी वृक्षारोपण समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भदंत संघरत्न माणके होते. अध्यक्षीय भाषणात भदंत संघरत्न माणके यांनी भदंत सदानंद महास्थविर यांच्या धम्मकार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणासारखे उपक्रम समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी पूज्य भदंत नागदिपंकर यांनी महास्थविर यांच्या अभिधम्म, विपश्यना, धम्मप्रसार, लेखन व वक्तृत्व क्षेत्रातील कार्याचा आढावा घेत देश-विदेशात त्यांनी बुद्धधम्माचा संदेश पोहोचविल्याचे नमूद केले. भदंत धम्मशिखर यांनी वृक्षांचे पर्यावरण संवर्धनातील महत्त्व, बुद्धधम्मातील निसर्गप्रेम आणि प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. यावेळी पञ्ञा मेत्ता संघाच्या वतीने डॉ. योगेंद्र बनसोड यांनी विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप केले. कार्यक्रमात शाळेच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. यावेळी अमर घरडे, शिलरत्न कवाडे, निरंजन ढोलेकर, दक्षायन सोनवणे, विलास नितनवरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी भदंत सदानंद महास्थविर यांना विनम्र अभिवादन करून वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

# महत्वाचे

## ऊषाकिरण आत्राम यांची 'भुक' कथा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात!



**अमरावती :** संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती, बीए चे सेमिस्टर 6चे पाठ्यक्रमात ऊषाकिरण आत्राम यांची 'भुक' कथा, मराठी अभ्यास मंडळानी सन 2026 करीता निवड केलेली आहे. या पूर्वी अहेर कथासंग्रहातील कथा मुंबई, पुणे, नांदेड, गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. अहेर कथासंग्रह इंग्लिश व हिन्दी मध्ये अनुवादित होवून लवकरच वाचायला मिळेल. भुक ही कथा गोंडी, हिन्दी, मराठी, बंगाली मध्ये अनुवादित आहे व हजारो विद्यार्थी, वाचकांपर्यंत ती पोहोचली आहे. डॉ प्रतिभा जाधवनी तिचे अभिवाचन केलेले आहे. भुक कथा अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यामुळे ऊषाकिरण आत्राम ताराम यांचे माणिक गेडाम, सतिश पारधी, डॉ. अनमुलवाड, अर्चना सयाम, रमेश कासा, नंदकिशोर नेताम व अनेक मित्र मैत्रिणी ,विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने मोठी हानी : जयदीप कवाडे

**नागपूर :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, बिहारचे माजी राज्यपाल तथा पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे यांनी तीव्र दुःख व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## भीमोदय बुद्ध विहारात गुरुवारी धम्म प्रबोधन

**नागपूर :** राष्ट्रीय बौद्ध महासभा (RBM) व भीमोदय मंडळ, भीमोदय बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता विश्वकर्मानगर येथील भीमोदय बुद्ध विहारात साप्ताहिक धम्म प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात दीक्षाभूमी वंदना संघाचे प्रसिद्ध लेखक श्रीराम बनसोड हे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. बुद्धांच्या धम्मातील तत्त्वे, मानवी जीवनातील त्यांचे महत्त्व आणि सामाजिक परिवर्तनातील धम्माची भूमिका यावर ते विचार मांडणार आहेत. या धम्म प्रबोधन कार्यक्रमाला परिसरातील उपासक-उपासिका, युवक-युवती तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक कवी शिवा प्रधान यांचा सत्कार




**अमरावती :** विदर्भ साहित्य संघ नागपूर शाखेंतर्ग अमरावती तर्फे पदग्रहण सोहळा तपोवन. अमरावतीला प्रा. डॉ. सुभाष गवई यांचे अध्यक्षतेखाली नुकताच नव निर्वाचीत कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा तपोवनमधे पार पडला. त्या विसास जिल्हा कार्य कारिणीत ज्येष्ठ साहित्यिक कवी समतेचे प्रभातककर अ भा म सा प चे विभागीय अध्यक्ष शिवा प्रधान यांचा कार्य कारिणीत जिल्हा सदस्य म्हणून निवड झाली. त्या करिता त्यांचा सत्कार विसासचे डॉ. बेलसरे, शोभा रोकडे, प्रा. डॉ. सुभाष गवई, डॉ. निकम, डॉ. वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते नुकताच झाला. त्यामधे शाल आणि नियुक्तीपत्र पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. याकरिता विसासचे कुमार बोबडे, राजेश बाहाळे, विवेक कवठेकर, प्रा. डॉ. प्रविण गुल्हाने, पद्माकर मांडवधरे, शितल राउत, आबासाहेब कडू, मंजू वणवे (पाटील), विशाल मोहोड, इंजी. उमेश शहारे, प्रा. डॉ. संतोष बनसोड, डॉ. शरद गोरे, प्रा. डॉ. अनिता धुर्वे, प्रा. डॉ. सुजाता नवनाथ पुरी, डॉ. शिवाजी वाठौरे प्रा. डॉ. अभिजीत प्रधान, प्रतिभा प्रधान, सुदर्शन गांग, प्रा. डॉ. वसुधा प्रधान, सुनिल उमाटे, साधना पराते, वंदना उमाटे, प्रा., डॉ. ईंद्रजित ओरके देवीदास मेटांगे आदिंनी याबद्दल शिवा प्रधान यांचे अभिनंदन केले आहे.

## काष्ट्राईब तर्फे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**नागपूर :** श्रमिकांचे नेते थोर साहित्यिक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित महाराष्ट्र राज्य काष्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघातर्फे दीक्षाभूमी येथील पुतळ्याला अरुण गाडे यांचे हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. रमेश पिशे, श्यामराव हाडके, राजेश ढेंगरे, मुकुंद मेंढे, एम. एस. जांभुळे, सुरेश तामगाडगे, रवि पोथारे, कैलास खोंडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अरुण गाडे यांनी अनुसूचित जातीमधील सर्व 59 जातीनी एकजुटीने राहणे व उपवर्गीकरण होऊ नये यासाठी आपली एकजूट कायम ठेवावी असे सांगितले.

## नागार्जुना अभियांत्रिकी महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा




**नागपूर :** तंत्रज्ञान व व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य नागार्जुना इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (NIETM) या संस्थेला अधिकृतपणे स्वायत्त (Autonomous) दर्जा प्राप्त झाला आहे. या महत्त्वपूर्ण यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत नवा टप्पा गाठला गेला आहे. २००९ मध्ये स्थापन झालेल्या अमरावती रोडवरील सातनवरी येथील या संस्थेला यावर्षी कैरो (इजिप्त) येथे झालेल्या सोहळ्यात इंटरनॅशनल ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड-२०२६ नेही सन्मानित करण्यात आले आहे.

स्वायत्त दर्जामुळे उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रमात बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य विकास, संशोधनाला प्रोत्साहन तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील प्लेसमेंटच्या अधिक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत. मैत्रेय शैक्षणिक संस्थेचे सचिव प्रदीप नगरारे यांनी स्वायत्ततेमुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण देणे अधिक प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला. संस्थेचे कोषाध्यक्ष कुलदीप रामटेके यांनी हे यश विद्यार्थी, प्राध्यापक आणि संस्थेसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल नागपूरसह देशभरातील पालक, माजी विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बहुपत्नीत्वाच्या तरतुदींविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका; केंद्राला नोटीस




**नागपूर :** मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील बहुपत्नीत्वाच्या तरतुदींना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेतली असून केंद्र सरकारसह संबंधित विभागांना नोटीस बजावून उत्तर मागविले आहे. पहिल्या पत्नीच्या हयातीत दुसरे लग्न अवैध व शिक्षापात्र गुन्हा घोषित करण्याबरोबरच विवाह, वारसाहक्क आदी बाबींमध्ये लिंग-निरपेक्ष कायदे करण्याची मागणी याचिकेत केली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही याचिका दाखल झाली आहे. भारतीय मुस्लिम महिला आंदोलनाच्या डॉ. झकिया सोमन, डॉ. नूरजहान साफिया नियाझ, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे डॉ. शमसुद्दिन तांबोळी, जावेद आनंद आणि बद्र सईद हे याचिकाकर्ते आहेत.

याचिकेत मुस्लीम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट, १९३७ मधील कलम २ च्या घटनात्मक वैधतेवर प्रश्न उपस्थित केला आहे. बहुपत्नीत्वाची परवानगी ही संविधानातील समानता, भेदभावास मनाई आणि सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील दुसऱ्या विवाहासंदर्भातील तरतुदी सर्व नागरिकांना समानपणे लागू करण्याची मागणीही केली आहे. केंद्र सरकारचा प्रतिसाद प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



## 'वनार्टी'मध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

**नागपूर :** लोकशाहीर तथा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रशांत वावगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा सविस्तर आढावा घेतला. औपचारिक शिक्षणाची संधी जवळपास मिळाली नाही, मात्र जिद्द, प्रतिभा आणि समाजाविषयीची प्रखर बांधिलकी यांच्या बळावर त्यांनी मराठी साहित्यविश्वात अजरामर ठसा उमटविला. सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास थेट जनसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहोचला. कादंबऱ्या, कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्याच्या माध्यमातून त्यांनी वंचित, श्रमिक आणि उपेक्षित समाजाचा आवाज बुलंद केला. 'फकीरा' ही त्यांची कादंबरी आजही मराठी साहित्याचा मैलाचा दगड मानली जाते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व्यक्तीच्या साहित्याचा गौरव थेट रशियासारख्या देशात होतो, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचेही प्रशांत वावगे यांनी सांगितले. कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक डॉ. चेतन बन्सोड यांच्यासह 'वनार्टी'चे अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराजस्व-समाधान शिबिरात हजारो नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ




**सडक अर्जुनी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री, लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आशीर्वाद लॉन येथे आयोजित विधानसभा स्तरीय छत्रपती शिवाजी महाराज 'महाराजस्व-समाधान' शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ख. प्रफुल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात आमदार राजकुमार बडोले, आमदार अविनाश ब्राह्मणकर, अप्पर जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे, तहसीलदार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शिबिरात संजय गांधी योजना, पीएम किसान, पीएमएफएमई, आयुष्मान भारत, उमेद, बचत गट कर्जवाटप, रेशन कार्ड, मालकी हक्काच्या सनदा, वनपट्टे, 'जीवंत सातबारा' अभियान, श्रावणबाळ योजना आणि राजमाता जिजाऊ महिला सशक्तीकरण योजनेसह विविध योजनांचा लाभ हजारो नागरिकांना देण्यात आला. यावेळी खासदार प्रफुल पटेल यांनी शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. कार्यक्रमाला सीता रहांगडाले, लक्ष्मण भगत, चेतन वडगाये, आम्रपाली डोंगरवार, सुधा रहांगडाले, यशवंत गणवीर, डॉ. अविनाश काशीवार, तेजराम मडावी, राजेश कठाणे, लोकपाल गहाणे, रमेश चुऱ्हे, शिवाजी गहाणे, रजनी गिरीपुंजे, वंदना डोंगरवार, कामिनी कोवे, शाहिस्ता शेख, दीक्षा भगत, रीता लांजेवार, योगेश नाकाडे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ

### विभागीय आयुक्तांना निवेदन; मतदार नोंदणी प्रक्रियेत सुधारणांची मागणी



**नागपूर :** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदवीधरांच्या मतदार नोंदणीतील अडचणी दूर कराव्यात आणि निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करावी, या मागणीसाठी बहुजन समाज पक्षाचे (BSP) अधिकृत उमेदवार संजय थूल यांच्या नेतृत्वात नागपूर विभागाचे विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना एक सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनाद्वारे संजय थूल यांनी प्रशासनाकडे पदवीधर मतदारांच्या हितासाठी खालील प्रमुख मागण्या मांडल्या आहेत : मतदार नोंदणीला गती व नियमित याद्यांची प्रसिद्धी : पदवीधर मतदार नोंदणी अर्जांच्या पडताळणी प्रक्रियेचा वेग वाढवावा. तसेच अर्जदारांना त्यांच्या नावाची खात्री करता यावी यासाठी ठराविक अंतराने अद्ययावत मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात याव्यात. अर्जाच्या स्थितीबाबत स्वयंचलित (Automated) संदेश सुविधा : नोंदणी अर्ज मंजूर किंवा नामंजूर झाल्याची माहिती अर्जदाराला त्वरित मिळावी. यासाठी एसएमएस (SMS) व ई-मेल अलर्ट प्रणाली सुरू करण्यात यावी. अर्ज फेटाळल्यास त्याचे स्पष्ट कारण नमूद करावे, जेणेकरून त्रुटी दुरुस्त करता येतील. नाव शोधण्यासाठी विशेष मोबाईल ॲपची निर्मिती : पदवीधरांना मतदार यादीत आपले नाव, ॲप्लिकेशन स्टेटस किंवा मतदान केंद्र सहज शोधता यावे यासाठी नागपूर मतदारसंघासाठी विशेष मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात यावे.भौगोलिक अंतर व लोकसंख्येनुसार मतदान केंद्रांत वाढ : नागपूर विभागातील जिल्ह्यांमधील ग्रामीण व दूरवरच्या भागातील मतदारांची सोय लक्षात घेऊन, तसेच गर्दी टाळण्यासाठी लोकसंख्या व भौगोलिक अंतर यानुसार अतिरिक्त मतदान केंद्रे मंजूर करण्यात यावीत. संजय थुल यांनी स्पष्ट केले की, पदवीधरांना मतदानाचा हक्क बजावताना कोणत्याही प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी बहुजन समाज पक्ष निरंतर प्रयत्नशील राहील.

## अभिनव सोशल फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**हिंगणा :** अभिनव सोशल फाउंडेशनच्या वतीने उत्तर नागपूरातील अनुदानित मराठी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळांतील एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृह आवळेबाबू चौक येथे नुकताच संपन्न झाला. फाउंडेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पंचभाई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सत्कार कार्यक्रमाला सुप्रसिद्ध कवी व लेखक डॉ. शशीकांत शर्मा, माजी शिक्षणाधिकारी किशोर चौधरी, सामाजिक कार्यकर्ते अनिता व परमेश्वर बोदिले हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. बोर्ड परीक्षेत शाळेतून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. प्रमुख अतिथींनी आपल्या मार्गदर्शनातून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. फाउंडेशनचे सचिव बंडू भैसारे यांनी प्रास्ताविकातून फाउंडेशनच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश वाकडे यांनी केले व कोषाध्यक्ष अजहर हुसेन यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला फाउंडेशनचे पदाधिकारी मधुकर राऊत, पलीराम कराडे, अनेक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मैत्रीदिनानिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात रंगले आषाढ कविसंमेलन




**नागपूर वार्ता :** 'अक्षरक्रांती फाऊंडेशन' व 'कला गौरव संस्था' नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदासा येथील मातोश्री वृद्धाश्रमात मैत्रीदिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकीतून वृद्धांचेसुद्धा मनोरंजन व्हावे, त्यांच्या दुःखावर मायेची फुंकर घालावी; या दृष्टीने सदर आषाढ कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या पहिल्या सत्रात कला गौरव संस्थेद्वारे अध्यक्ष डॉ. संगीता बनाईत आणि चमूद्वारा प्रस्तुत 'संगीतवारी' ह्या बहारदार कार्यक्रमात मराठी भावगीत, भक्तीगीत, अभंग, बहिणाबाई चौधरी यांच्या स्वरबद्ध कविता तसेच अजरामर मराठी गीतांची मैफल आयोजित केली होती. कार्यक्रमाचे उद्‌घाटन ज्येष्ठ कवी बाबा निमजे, सावनेर व वऱ्हाडी कवी दिवाकर देशमुख, अमरावती तथा वृद्धाश्रमातील लाभार्थी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन झाले. संगीतवारी कार्यक्रमात तेथील वृद्धाना मैत्रीदिनानिमित्त फुले देऊन स्वागत करीत त्यांनासुद्धा आपले दुःख विसरून फेर धरून मनसोक्त नाचविले. त्यानंतर 'वऱ्हाडी मायबोली' हा विनोदी वऱ्हाडी कविता व किस्से यांचा लोटपोट हसविणारा बहारदार कार्यक्रम सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी दिवाकर देशमुख यांनी सादर केला. अस्सल अशा चुलीवरच्या मराठमोळ्या गावरानी जेवणानंतर दुपारच्या दुसऱ्या सत्रात राजुरा येथील सुप्रसिद्ध कवी, गजलकार डॉ. किशोर कवठे यांच्या अध्यक्षतेखाली 'आषाढ कविसंमेलना'चे आयोजन केले होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून दैनिक राष्ट्रप्रकाश व देशोन्नति समूहाचे कार्यकारी संपादक तथा राष्ट्रीय कवी सुदर्शन चक्रधर, नागपूर तथा स्वागताध्यक्ष म्हणून मातोश्री वृद्धाश्रम आदासा येथील व्यस्थापक प्रदीप चंदनबटवे होते. संमेलनाध्यक्ष डॉ. कवठे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, 'आज समाजाला केवळ लिहिणारे साहित्यिक नव्हे तर आपल्या विचारांना कृतीची जोड देणारे कृतिशील साहित्यिक आवश्यक आहेत. ही जाणीव अशा कवीसंमेलनाच्या माध्यमातून अधिक दृढ होत असल्याचे आशादायी चित्र दिसून येते.' उपस्थित कवी कवयित्री यांच्या एकापेक्षा एक दर्जेदार अशा पाऊस, पाणी, शेती-माती, प्रेम तथा सामाजिक रचनांचे सादरीकरण झाले तर या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बल्लारपूर येथील प्रसिद्ध गजलकार सुनील बावणे तथा नागपूरच्या सुप्रसिद्ध गजलकार चित्रा कहाते यांनी केले. आभार प्रदर्शन कवयित्री स्वाती सेलोकर यांनी केले. याप्रसंगी बालभारतीच्या अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश झाल्याबद्दल डॉ. मंदा नांदुरकर, अमरावती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात साहित्याच्या समावेशाबद्दल प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', नागपूर तसेच प्रा. मीनल येवले यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. तसेच बालसाहित्य कवितासंग्रह 'जंगल सफारी'च्या कवयित्री ॲड. नीता कचवे, अमरावती तसेच 'मन जेव्हा हिरवळले'च्या कवयित्री मंजुषा कऊटकर यांचाही पुस्तक प्रकाशनाबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे तथा कला गौरव संस्थेच्या अध्यक्ष डॉ. संगीता बनाईत यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लीलाधर दवंडे, भागवत बनाईत, देवेंद्र काटे, श्रीराम डोंगरे, मिताली आनंद, श्रेयस राजूरकर, प्रणाली दहाट, प्राजक्ता वऱ्होकर, कीर्ती लंगडे, वंदना घोरसेसह मातोश्री वृद्धाश्रमातील कर्मचारीवृंद यांनीसुद्धा अथक परिश्रम घेतले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648